## वर्सोवा-विरार सी लिंकला जपान करणार सहकार्य



**टोकियो** : राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि. २४) जपानचे केंद्रीय आर्थिक, व्यापार आणि उद्योगमंत्री यासुतोशी निशिमुरा यांची भेट घेतली. मुंबई ट्रान्सहार्बर लिंक, मेट्रो-३ प्रकल्पातील अडथळे दूर केल्याबद्दल त्यांनी या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतानाच वर्सोवा-विरार सी लिंकला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन जपान सरकारच्या वतीने दिले. जपानचे मंत्री यासुतोशी निशिमुरा म्हणाले की, जपान जी-७चे नेतृत्व करीत असून भारत जी-२०चे नेतृत्व करीत आहे. त्यामुळे हे दोन देश जागतिक पातळीवर मोठी भूमिका बजावू शकतात. जपान सरकार सातत्याने नवीन संशोधनाला चालना देत असून एमएसएमईला सहकार्य करीत आहे. याबद्दल उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी समाधान व्यक्त केले आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३९
www.ramprahar.com

शुक्रवार, २५ ऑगस्ट २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


आता जि.प. शाळांमध्येच भरणार अंगणवाड्या/२
नेत्रावती, दिवा-सावंतवाडी रेल्वेगाड्यांना रोह्यात थांबा/५
सराव सामन्यात श्रेयस अय्यरची वादळी खेळी/८


# वाशी खाडी पुलांचे काम प्रगतिपथावर

## सायन-पनवेल महामार्गावरील वाहतूक होणार अधिक सुलभ

## मंत्री दादाजी भुसे यांनी केली पाहणी





**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबईचे प्रवेशद्वार असलेल्या वाशी खाडी पुलावर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत सध्या सुरू असलेल्या पुलाच्या दोन्ही बाजूला दोन नवे खाडी पूल तयार होत असून त्यांचे काम प्रगततिपथावर आहे. नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी नव्याने होत असलेल्या एका पुलाचे काम मे २०२४पर्यंत पूर्ण करण्यात येईल व मुंबईकडे जाणारा खाडी पूल सप्टेंबर २०२४पर्यंत पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाममंत्री दादाजी भुसे यांनी वाशी येथे दिली.

मंत्री दादाजी भुसे यांनी गुरुवारी (दि. २४) सकाळी सायन-पनवेल महामार्गावरील वाशी येथील खाडी पूल कामाची पाहणी केली. यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, नवी मुंबई व मुंबईला जोडणारा पहिला खाडी पूल १९७१मध्ये तयार करण्यात आला होता. त्यानंतर याच वाशी खाडी पुलावर दुसरा खाडी पूल १९९५मध्ये सुरू करण्यात आला आहे. आता मोठ्या प्रमाणात वाढलेल्या वाहनांच्या संख्येमुळे या मार्गावर वाहतूक कोंडी होत असून नव्याने तयार करण्यात येत असलेले पूल लवकरात लवकर बांधून पूर्ण करण्यात येतील. यातील एक पूल मे २०२४ व नवी मुंबईकडून मुंबईकडे जाणारा तिसरा खाडी पूल २०२४पर्यंत पूर्ण करण्यात येईल. त्यामुळे नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका होईल.

नव्या होणाऱ्या तिसऱ्या खाडी पुलावरून नागरिकांना अधिकची सुविधा उपलब्ध होणार असून हे काम वेगाने सुरू असल्याचे मंत्री भुसे यांनी सांगितले.

यानंतर मंत्रीमहोदयांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग (मिसिंग लिंक)ची लोणावळा येथे जाऊन पाहणी केली.



# पंतप्रधान मोदींकडून समाजातील प्रत्येक घटकाला समान हक्क

## आमदार महेश बालदी यांचे प्रतिपादन; कामगारांना साहित्यवाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजातील प्रत्येक घटकाला समान हक्क देण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी करीत असून याचा मला अभिमान आहे, असे प्रतिपादन उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी गुरुवारी (दि. २४) केले.

महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाच्या वतीने लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम करणाऱ्या कामगारांसाठी अत्यावश्यक साहित्याच्या वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी आमदार महेश बालदी बोलत होते.

विमानतळ परिसरात झालेल्या या कार्यक्रमास एलॲण्डटी कंपनीचे प्रशासन प्रमुख पी. कृष्णन, जयप्रकाश टी.के., कन्स्ट्रक्शन मॅनेजर उमेश पाटील, अदानी कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक दिनेश ओझा, प्रकाश लोटणकर, सहाय्यक कामगार आयुक्त शितल कुलकर्णी, जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, अमर म्हात्रे, चंद्रकांत कडू, निलेश खारकर, मंगेश केदारी यांच्यासह कामगार उपस्थित होते. या वेळी आमदार महेश बालदी व इतर मान्यवरांच्या हस्ते कामगारांना साहित्याचे वाटप करण्यात आले.



**पनवेल : माजी नगराध्यक्ष तथा भाजपचे शहर उपाध्यक्ष संदीप पाटील यांनी नवीन पनवेल सेक्टर १७ येथे सुरू केलेल्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. हे जनसंपर्क कार्यालय नागरिकांच्या समस्या सोडवण्याचे केंद्र बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त करून पाटील यांचे अभिनंदन केले. या वेळी माजी नगरसेवक अनिल भगत, समीर ठाकूर, अजय कांडपिळे, भाजप नेते ॲड. जितेंद्र वाघमारे, निकिता जगदीश घरत, बोकडवीराच्या माजी सरपंच मानसी पाटील, काका भगत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.**

## ज्येष्ठ अभिनेत्री सीमा देव यांचे निधन



**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी आणि हिंदी सिनेसृष्टीतील सोज्वळ अभिनेत्री अशी ओळख असलेल्या अभिनेत्री सीमा देव यांचे गुरुवारी (दि. २४) सकाळी दीर्घ आजाराने निधन झाले. वयाच्या ८१व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दिवंगत अभिनेते रमेश देव यांच्या त्या पत्नी होत्या.

सीमा देव यांनी ८०पेक्षा जास्त मराठी आणि हिंदी चित्रपटांत काम केले आहे. आपल्या बहारदार अभिनयाने त्यांनी चित्रपटसृष्टीत एक वेगळाच ठसा उमटवला. 'आनंद' या सिनेमात त्यांनी केलेली भूमिका आजही लोकांच्या स्मरणात आहे. २०१७मध्ये पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील (पिफमधील) पुरस्कार सोहळ्यात सीमा देव यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. त्यांना २०२०मध्ये अल्झायमर्स या आजाराने ग्रासले होते. याच आजाराने त्यांचे मुंबईतील जुहू येथील घरी निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

## निवडक

### राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये 'रॉकेट्री'चे यशस्वी उड्डाण

**मुंबई** : ६९व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा गुरुवारी (दि. २४) झाली. यामध्ये रॉकेट्री : द नंबी इफेक्ट सर्वोत्कृष्ट फीचर फिल्म, सरदार उधम सिंह सर्वोत्कृष्ट हिंदी सिनेमा, तर एकदा काय झालं हा सर्वोत्कृष्ट मराठी सिनेमा ठरला. अभिनेता अल्लू अर्जुनला पुष्पा-द राइज या सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा, तर अभिनेत्री आलिया भट्टला गंगूबाई काठियावाडी व क्रिती सेननला मिमी सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

### भारतीय बुद्धिबळपटू प्रग्नानंद उपविजेतेपदाचा मानकरी

**बाकू** : बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना मॅग्नस कार्लसन याने जिंकत विजेतेपद पटकाविले आहे. भारताच्या आर. प्रग्नानंदला टायब्रेकर सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. दोन्ही क्लासिक गेम अनिर्णित सुटल्याने गुरुवारी (दि. २४) टायब्रेकरमध्ये सामना खेळवण्यात आला. यामध्ये कार्लसनने बाजी मारली.

## रायगडात आतापर्यंतच्या पावसात ३३ बळी, ८२० घरांचे नुकसान



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात पावसाने आतापर्यंत ३३ बळी घेतले असून एकूण ८२० घरांचे नुकसान झाले आहे. याशिवाय ५१ गोठ्यांना हानी पोहचली. १५२ जनावरे मृत्युमुखी पडली, तर नऊ हजार ५३२ हेक्टर क्षेत्रात ३३ टक्क्यांपेक्षा जास्त शेतीला फटका बसला आहे.

जिल्ह्यात जून महिन्यात कमी पाऊस झाला, पण जुलै महिन्यात चांगला पाऊस पडला. त्यानंतर ऑगस्ट महिन्यात मात्र पुन्हा पावसाचा जोर कमी झाला. वार्षिक पर्जन्यमानाच्या ८१.९ टक्के पाऊस पडला आहे. जिल्ह्याचे वार्षिक पर्जन्यमान सरासरी तीन हजार १४८ मिलीमीटर आहे. २४ ऑगस्टपर्यंत दोन हजार ५७७ मिमी पाऊस पडला आहे. अलिबाग, उरण, पेण, मुरूड या चार तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला आहे.

यंदाच्या पावसाळ्यात जिल्ह्यात ३३ जणांचा बळी गेला आहे. खालापूर तालुक्याच्या इर्शाळवाडीतील ५७ जण बेपत्ता आहेत. ३४ पक्की घरे व ३७ कच्ची घरे पूर्णतः पडली. ५१९ पक्क्या घरांचे व ३२० कच्च्या घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. ५१ गोठ्यांचे नुकसान झाले. ७५ मोठी, तर ७७ लहान जनावरे मृत्युमुखी पडली आहे.

**पावसाची तालुकानिहाय टक्केवारी**

अलिबाग १११.५, पनवेल ९८.८, कर्जत ८२.६, खालापूर ७२.२, उरण १२०.६, सुधागड ७३.२, पेण १०२.८, महाड ८९.७, माणगाव ७७.४, रोहा ७६.४, पोलादपूर ८८.८, मुरूड १०१.९, श्रीवर्धन ७६.८, म्हसळा ७४२, तळा ८३.८.





**नवी मुंबई : वाशी येथील श्री रामकृष्ण नेत्रालयाच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गुरुवारी भेट देत शुभेच्छा दिल्या. नेत्रालयाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी मेडिकल डायरेक्टर डॉ. सुहास देशपांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन भूमकर, काचबिंदू व मोतिबिंदूतज्ज्ञ डॉ. विजय शेट्टी व सहकारी उपस्थित होते.**

# जंजिरा किल्ला लवकरच पर्यटकांसाठी खुला

## पुरातत्त्व खात्याची माहिती



**मुरुड : प्रतिनिधी**

निसर्गरम्य मुरुडमध्ये पर्यटकांचे एक आकर्षण असलेला जंजिरा किल्ला लवकरच पुन्हा खुला होणार आहे. पुरातत्त्व खात्याने याबाबत माहिती दिली.

मुरुड शहरापासून काही अंतरावर असलेला ऐतिहासिक जंजिरा किल्ला पावसाळ्यात शासनाकडून पर्यटकांच्या सुरक्षेच्या कारणास्तव बंद करण्यात आला होता. या किल्ल्याकडे जाण्यासाठी राजपुरी जेट्टी, खोरा बंदर, दिघी बंदरावरून बोटींची व्यवस्था असते. हा किल्ला पाहण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक भागातून दरवर्षी लाखो पर्यटक येत असतात. त्यामुळे किल्ला पर्यटकांसाठी खुला करावा, अशी मागणी स्थानिकांमधून होत आहे.

याबाबत पुरातत्त्व खात्याचे अधिकारी बजरंग येलीकर यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, येत्या ३० ऑगस्ट रोजी जंजिरा किल्ल्याचे दरवाजे उघडले जातील, परंतु संपूर्ण किल्ला स्वच्छतेकरिता आठ दिवस लागतात. तोपर्यंत मेरीटाईम बोर्डाचाही पत्रव्यवहार होईल. वातावरण पाहून साधारणपणे किल्ला पर्यटकांसाठी १० सप्टेंबरपासून सुरू करू.

महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाचे बंदर निरीक्षक प्रमोद राऊळ यांनी सांगितले की, जंजिरा किल्ल्यावर बोटी सुरू करणे व त्याला परवानगी देण्याचे काम आम्ही करतो, तर किल्ल्याच्या चाव्या पुरातत्त्व खात्याकडे आहेत. सध्या समुद्र शांत असून बोटी सुरू करण्यास कोणतीही हरकत नाही.

# राख्यांवरही चांद्रयान-३ची छाप!





## बाजारपेठांमध्ये वाढती मागणी

**पनवेल : वार्ताहर**

भावा-बहिणीच्या अतूट नात्याचे प्रतिक असणारा रक्षाबंधन सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे बाजारपेठांमध्ये राखी खरेदीला वेग आला आहे. भारताने नुकतेच चांद्रयान-३ हे चंद्रावर यशस्वीपणे उतरवले. त्याची छाप यंदा राख्यांवरही पहावयास मिळत आहे.

रक्षाबंधन येत्या बुधवारी म्हणजेच ३० ऑगस्ट रोजी असल्याने बाजारात रंगीबेरंगी राख्या लक्ष वेधून आहेत. गोंडा, कलाकुसर, पारंपरिक राख्या विक्रीसाठी आल्या आहेत. लहान मुलांसाठी पुष्पा चित्रपटातील कलाकारांचे चित्र असलेली तसेच लाईट, घड्याळाच्या राख्या आकर्षणाचे केंद्र ठरल्या आहेत. यंदा चांद्रयान राखी बाजारात दाखल झाली असून नागरिकांकडून या राखीला मागणी होत असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

दरम्यान, वाहतुकीचा खर्च, कच्च्या मालाचे वाढलेले दर यामुळे राखीच्या किमतीमध्ये गतवर्षीच्या तुलनेने यंदा दहा ते पंधरा टक्क्यांनी वाढ झाल्याचे राखी विक्रेत्यांनी सांगितले.

# दहीहंडीसाठी गोविंदा पथकांचा जोरदार सराव

**धाटाव : प्रतिनिधी**

गोपाळकाला अर्थात दहीहंडी सण ७ सप्टेंबर रोजी असल्याने गोविंदा पथकांचा सराव सुरू झाला आहे. पथकातील युवक दैनंदिन कामे आटपून मोकळ्या जागेत एकत्र येऊन जोरदार सराव करताना दिसत आहेत.

दहीहंडी फोडणे, सलामी देणे, शिस्तबद्ध संघ अशी वेगवेगळी बक्षिसे आयोजकांच्या वतीने दिली जातात. हे लाखो रुपयांचे बक्षीसरूपी लोणी चाखण्यासाठी गोविंदा पथके सज्ज होत आहेत. ग्रामीण भागातही याची क्रेझ दिसून येत आहे.

दहीहंडीसाठी रोहा तालुक्यातील नवतरुण तळाघर, गावदेवी तळाघर, काळभैरव बोरघर, जय बजरंग लांढर, सोनारसिद्ध धाटाव, गावदेवी किल्ला, सापया वरसगाव, देवकान्हे, गावदेवी बाहे, वाघेश्वर रोठ, काळभैरव वरसे, जय भवानी गावठाण, लोटनेश्वर खारी, खारगाव, अष्टमी, आमडोशी यासह अनेक पथकांनी उंच मानवी मनोरे रचण्यासाठी कंबर कसली आहे.

आतापर्यंत तालुक्यातील वाघेश्वर देवकान्हे, वाघेश्वर रोठ खुर्द, जय बजरंग लांढर व आमडोशी या गोविंदा पथकांनी सात थर लावून मानाच्या दहीहंडीवर नाव कोरले आहे. या वर्षी सर्वच गोविंदा पथके सात थरांचा सराव करताना दिसत आहेत, तर देवकान्हे येथील पथक आठ थर लावण्याची शक्यता आहे.



(छाया : जितेंद्र जाधव)

# आता जि.प. शाळांमध्येच भरणार अंगणवाड्या



## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील अनेक अंगणवाड्या भाडेतत्त्वावरील खोल्यांमध्ये चालविल्या जात आहेत. अंगणवाड्यांना स्वमालकीच्या इमारती असण्याबरोबरच वीज, पाणी आदी पायाभूत सुविधा दिल्या पाहिजेत. या अनुषंगाने ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांच्या इमारतींमध्ये मोकळ्या राहणाऱ्या वर्ग खोल्या अंगणवाडीच्या बालकांसाठी वापरण्याबाबत धोरण तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

महिला व बाल विकास विभागाच्या विविध प्रश्नांसंदर्भात उपमुख्यमंत्री पवार यांनी गुरुवारी (दि. २४) मंत्रालयात बैठक घेतली. या बैठकीस महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष ॲड. सुशीबेन शहा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या आयुक्त रुबल अग्रवाल, राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सचिव शिवराज पाटील, महिला व बालविकास विभागाचे आयुक्त प्रशांत नारनवरे, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक डॉ. इंदू जाखड, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव श्रद्धा जोशी आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, राज्यातील ग्रामीण भागात ९४ हजार ८८६, तर नागरी भागात १५ हजार ६०० अशा एकूण एक लाख १० हजार ४८ अंगणवाड्या कार्यरत आहेत.

त्यापैकी २१ हजार ९६९ अंगणवाड्या भाडेतत्त्वावरील इमारतीत भरतात, तसेच इतर ९०६० अंगणवाड्या समाजमंदिर, वाचनालयाच्या इमारतीत भरतात. लहान मुलांना आनंददायी शिक्षण मिळण्यासाठी त्यांना पुरेशी जागा व इतर सुविधा मिळाल्या पाहिजेत. त्यामुळे ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांच्या इमारतींमध्ये मोकळ्या राहणाऱ्या वर्गखोल्या अंगणवाडीच्या मुलांसाठी वापरता येऊ शकतात. त्या दृष्टीने ग्रामविकास विभागामार्फत धोरण तयार करावे, तसेच शहरांमधील अंगणवाड्यांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत निधी देण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

राज्य महिला आयोग, राज्य बालहक्क संरक्षण आयोग यांची कार्यालये सध्या वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. महिलांना आपल्या तक्रारी, निवेदने घेऊन येण्यास सोयीचे व्हावे, यासाठी सोयीच्या ठिकाणी कार्यालय उपलब्ध करून द्यावे. या दोन्ही आयोगांना प्रभावी काम करता यावे यासाठी मनुष्यबळ, स्वच्छतागृहे आदी बाबीदेखील पुरविण्यात याव्यात. त्यासाठी लागणारा आवश्यक निधी त्यांना देण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

मुंबईतील मानखुर्द व बोर्ला तसेच पुण्यातील हडपसर आणि येरवडा याठिकाणी महिला व बालविकास विभागाच्या मालकीच्या जमिनी आहेत. या जमिनींवर काही ठिकाणी अतिक्रमण झाले आहे. ही अतिक्रमणे हटवून त्यांचा वापर विभागाच्या आवश्यक बाबींसाठी करण्याबाबतचा आराखडा सादर करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या.

# पुणे-मुंबई मिसिंग लिंक सप्टेंबर २०२४मध्ये खुला

## मंत्री दादाजी भुसे यांचे आश्वासन



**पुणे : प्रतिनिधी**

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी मिसिंग लिंकची उभारणी करण्यात येत आहे. याचे ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे सप्टेंबर २०२४मध्ये हा मार्ग प्रवाशांच्या सेवेत दाखल होईल, असे आश्वासन सार्वजनिक बांधकाममंत्री दादाजी भुसे यांनी दिले आहे.

मंत्री भुसे यांनी लोणावळा ते खालापूरदरम्यान उभारण्यात येत असलेल्या मिसिंग लिंकच्या कामाची पाहणी गुरुवारी (दि. २४) केली. पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर सध्या लोणावळा ते खालापूर हे अंतर १९ किमी इतके आहे. या प्रवासादरम्यान बोरघाटात होणारी वाहतूक कोंडी होते. ही कोंडी या मिसिंग लिंकमुळे फुटेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

सोबतच प्रस्तावित मार्गाने सहा किमीची आणि किमान अर्धा तासाची बचत होणार आहे. एकूण १३ किमीच्या या मिसिंग लिंकमध्ये दोन बोगदे आणि दोन पूल उभारले जात आहेत.

पुणे आणि मुंबई या दोन महानगरांना जोडण्यासाठी महत्त्वाचा ठरणारा मिसिंग लिंक सप्टेंबरमध्ये खुला होईल. खालापूर ते सिंहगड असा हा मिसिंग लिंक प्रकल्प असेल. आता जर आपण पाहिले तर खालापूर ते सिंहगडपर्यंतचे अंतर हे १९ किमी इतके आहे. मिसिंग लिंक प्रकल्प सुरू झाल्यानंतर हे अंतर १३.३० किमी इतके होईल.


एकंदरीत सहा किमी इतके अंतर या प्रकल्पामुळे कमी होईल तसेच घाटातील अपघात टाळण्यासाठी आणि शून्य अपघात रस्ता बनवण्यासाठी हा प्रकल्प सुरू करण्यात आला. प्रवासाचे तासही कमी होणार आहेत. यातील बोगद्याची एकूण लांबी १०.५५ किमी, त्यापैकी २.५ किमी बोगदा लोणावळा तलावाच्या तळापासून १७५ मीटर खालून जातो. हा आशिया खंडातील सर्वात रुंद बोगदा असून त्यांची रुंदी २३.७५ मीटर आहे. एकूण दोन ब्रीज, एकाची लांबी ९०० मीटर तर दुसरा केवळ स्टेंड ब्रीज ६५० मीटर लांब असेल, अशी माहितीही मंत्री दादा भुसे यांनी दिली.

# मध्य रेल्वेवर शनिवारी विशेष वाहतूक ब्लॉक

**मुंबई : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेवरील कल्याण ते अंबरनाथ विभागात विशेष वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. उल्हासनगर स्थानकात पादचारी पुलाच्या कामासाठी शनिवारी (दि. २६) रात्री ब्लॉक घेण्यात येईल. त्यामुळे रात्री ११.५१ सीएसएमटी ते अंबरनाथ आणि रात्री १०.०१ व रात्री १०.१५च्या अंबरनाथ ते सीएसएमटी लोकल रद्द केल्या आहेत, तसेच रात्री कर्जतकडे जाणाऱ्या लोकलचे वेळापत्रक बदलण्यात आले आहे.

मध्य रेल्वेवरील उल्हासनगर स्थानकावरील फलाट क्र. १ वरून फलाट २वर पादचारी पुलाचे खांब स्थलांतरित करण्यासाठी आणि हायड्रा मशीनद्वारे त्यांची उभारणी करण्यासाठी कल्याण-अंबरनाथ विभागात अप आणि डाऊन मार्गावर रात्रकालीन विशेष वाहतूक ब्लॉक घेण्यात आला आहे. शनिवारी रात्री १.१० ते रात्री २.१० पर्यंत एक तासाचा ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे



काही गाड्या रद्द करण्याबरोबरच सीएसएमटी येथून रात्री १२.०४ वाजता सुटणारी अंबरनाथ लोकल कुर्ल्यापर्यंत चालवण्यात येईल.

सीएसएमटी येथून रात्री १२.२५ वाजता सुटणारी कर्जत लोकल कल्याण स्थानकावर रात्री १.५१ ते रात्री २.१० या वेळेत थांबवण्यात येईल. ब्लॉक कालावधीत कल्याण ते अंबरनाथ दरम्यान मालवाहतूक गाड्यांची वाहतूक बंद राहील, अशी माहिती मध्य रेल्वेकडून देण्यात आली.

# भाजप प्रदेशाध्यक्षांनी केले वैज्ञानिकांचे अभिनंदन

**गडचिरोली : प्रतिनिधी**

चांद्रयान-३ मोहीम यशस्वी झाल्याबद्दल भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'इस्रो'च्या वैज्ञानिकांचे अभिनंदन केले आहे. गडचिरोली येथे जुधवारी (दि. २३)चांद्रयान-३चे यशस्वी लँडिंग होत असतानाचा क्षण अनुभवला. समस्त भारतीयांसाठी हा अभिमानाचा आणि गौरवाचा क्षण आहे. या मोहिमेसाठी अहोरात्र कष्ट घेतलेल्या 'इस्रो'च्या वैज्ञानिकांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो, असे बावनकुळे यांनी पत्रकात म्हटले आहे.



चांद्रयान-३ मोहीम यशस्वी झाल्याबद्दल भाजपच्या प्रदेश कार्यालयात बुधवारी जल्लोष करण्यात आला. प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर, प्रदेश चिटणीस सुरेश बनकर, किरण पाटील, रामेश्वर भांदरगे, डॉ. सुभाष कदम, एस. एम. खान, प्रदेश कार्यालय सहसचिव भरत राऊत आदी या वेळी उपस्थित होते.

# पनवेलमधील मंदिरात सारीपाट खेळण्याची परंपरा कायम

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील लाईन आळीतील श्री हनुमान मंदिरात विश्वस्त कै. दशरथशेठ धोंडु कुरघोडे यांनी सुमारे ७०-८० वर्षांपूर्वी सुरू केलेला सारीपाटाच्या खेळाची प्रथा त्यांच्या तिसऱ्या पिढीनेही पुढे अबाधित ठेवली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री हनुमान मंदिरात दर सोमवारी, गुरुवारी व श्री कृष्ण जन्माष्टमीला सारीपाटाचा डाव मांडला जात आहे.

महाभारत काळापासून खेळला जाणारा सारीपाटाचा हा खेळ आजही ग्रामीण भागात जपला जात आहे. आपले ग्रामीणपण सोडत शहराकडे वाटचाल केलेल्या पनवेल शहरात लाईन आळीतील श्री हनुमान मंदिरात विश्वस्त कै. दशरथशेठ धोंडु कुरघोडे यांनी सुमारे ७०-८० वर्षांपूर्वी सुरू केला होता. देशस्थ मराठा मंडळ ट्रस्टच्या श्री हनुमान मंदिरात फार पूर्वीपासून पनवेलवासी सारीपाट हा खेळ श्रावण महिन्यात दर सोमवार, गुरुवारी व श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या सप्ताहात रोज खेळला जात आहे. त्या काळात पंचक्रोशितील शेकडो लोक हा खेळ खेळण्यासाठी यायची. कै. दशरथशेठ धोंडु कुरघोडे यांच्या निधनानंतर सारीपाट खेळ त्यांचे चिरंजीव श्री हनुमान मंदिर पनवेलवासी समस्त देशस्थ मराठा मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष व माजी नगरसेवक स्व. लक्ष्मणशेठ दशरथशेठ कुरघोडे यांनी सुरू ठेवला. आज त्यांच्या निधनानंतर कुरघोडे कुटुंबाची तिसरी पिढी ट्रस्टचे सचिव कुणाल लक्ष्मण कुरघोडे व सदस्य कपिल भरत कुरघोडे यांनी आपलीही परंपरा जपत पुढे घेऊन जाण्याचे ध्येय जपले आहे.

### असा खेळला जातो सारीपाट

*हा खेळ दोन गटात खेळवला जात असल्यामुळे ज्या गटाच्या सोंगट्या सारीपाटाच्या मध्यभागी जातील तो गट विजयी होतो, तर एका गटाने सोगटी मारल्यानंतर दुसऱ्या विरोधी गटाने त्या गटाची सोगटी मारली तर हा खेळ बरोबरीत सूटतो. काही वेळा दान जास्त पडल्यामुळे भूत उठते त्या वेळी या खेळाला मोठी गंमत येते. या खेळात एक डाव पूर्ण होण्यासाठी चार तास लागतात. विशेष म्हणजे या खेळात पैशाचा वापर केला जात नाही. आता आधुनिक काळात तरुणांच्या हातात स्मार्टफोन असतानासुद्धा कुरघोडे परिवारातील तरुणांनी दोन्ही गटाचे मुख्य खेळाडू सुभाष राऊत व नागेश भातणकर यांच्या समवेत ही परंपरा जोपासली आहे.*



# ज्येष्ठ पत्रकार विजय वैद्य यांना आचार्य अत्रे पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ पत्रकार विजय वैद्य यांना मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वतीने देण्यात येणार आचार्य अत्रे पुरस्कार राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते बुधवारी (दि. २३) प्रदान करण्यात आला.

यंदा आचार्य अत्रे यांचे १२५वे जयंती वर्ष आहे. विजय वैद्य यांना देण्यात आलेला 'आचार्य अत्रे' पुरस्कार हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून तो मानवी



चेहऱ्यासह पत्रकारितेच्या मोठ्या परंपरेचा सन्मान असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

आचार्य अत्रे यांच्या नावाचा पुरस्कार आपल्याला मिळाला याचा अतिशय आनंद झाला, असे विजय वैद्य यांनी सत्काराला दिलेल्या उत्तरात सांगितले.

मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे व कार्यवाह संदीप चव्हाण यांनी प्रास्ताविक केले तर विष्णू सोनवणे यांनी आभार मानले. या वेळी ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, माजी नगरपाल डॉ. जगन्नाथ हेगडे, ज्येष्ठ पत्रकार योगेश त्रिवेदी व इतर मान्यवर उपस्थित होते.



# रोह्यात विश्रांतीनंतर पुन्हा पाऊस सक्रिय

**रोहे : प्रतिनिधी**

गेले १५ दिवस पाऊस अधूनमधून येणाऱ्या पावसाने गुरुवारी सकाळपासून पुन्हा जोर धरला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह नागरिकही सुखावले आहे.

रोहा शहरासह ग्रामीण भागात पाऊस चांगला सक्रीय झाल्याचे दिसून आले. पावसाच्या प्रतीक्षेत असलेला बळीराजा गुरुवारी आलेल्या पावसामुळे सुखावला आहे. दिवसभर पाऊस उघडझाप करीत होता. या पावसामुळे भातशेतीला त्याचा फायदा होणार आहे. हवेत गारवा निर्माण झाला आहे.

## रिस येथे जुगार अड्ड्यावर छापा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील मौजे रिस गावच्या हद्दीत मोकळ्या पत्र्याच्या शेडमध्ये सात जण बेकायदेशीररित्या पैसे लावून स्वतःच्या फायद्याकरिता पत्ते खेळत असताना रसायनी पोलिसांनी या ठिकाणी छापा मारून त्यांच्याकडील रोख रक्कम सहा हजार ६०० रूपये व ५२ पानाचे पत्ते असा मुद्देमाल ताब्यात घेतला.

या प्रकरणी सात जणांवर महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ अ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक शत्रुघ्न माळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार खाडे अधिक तपास करीत आहेत. ही कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# आपटा गावातील स्मशानभूमीची दुरवस्था

**रसायनी : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील आपटा गावातील स्मशानभूमीची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली आहे. स्मशानभूमीवर लाईटची व्यवस्था करण्यात आलेली नाही. रात्री-अपरात्री मृत व्यक्तीचे अंत्यसंस्कार करण्यासाठी गेले असता, कुटुंब व ग्रामस्थांची हेळसांड होते.

स्मशानभुमीवर दारूचा अड्डा, स्मशानभुमी नदीकिनारी शौचालयास बसणे आदी प्रकार सर्रास दिसून येतात. किटा (लाकड) साठविण्यासाठी जी वास्तू बांधली आहे तीसुद्धा ग्रामस्थांनी लोकवर्गणी जमा करून बांधली आहे.



स्मशाभूमीतील परिसरात दारूच्या बाटल्या व कचऱ्याचे प्रमाण मुबलक प्रमाणात आढळत असून कोणत्याही प्रकारची साफसफाई दिसत नाही.

# अल्पवयीन मुलीबरोबर अश्लील कृत्य; चालकाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

दहावी इयत्तेत शिकणाऱ्या १४ वर्षीय मुलीसोबत अश्लील कृत्य करणाऱ्या इकोचालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रिंकू कुमार साहा (वय ४०, रा. उसर्ली खुर्द) असे त्याचे नाव असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

१४ वर्षीय पीडित तरुणीला आरोपी शाळेत ने-आण करण्याचे काम करतो. घटनेच्या दिवशी सायंकाळी ५ वा. च्या सुमारास गाडीत पीडित मुलगी एकटीच होती. चालकाने तिला पळस्पे येथे काम आहे असे सांगून नेले आणि गाडीत जाताना अश्लील कृत्य केले. मुलीला घरी यायला उशीर झाल्यानंतर तिच्या आईने विचारल्यानंतर मुलीने घडलेला सर्व प्रकार सांगितला.


## दुखवटा

### सुंदर अलीमचंदानी



**नवी मुंबई :** भाजप उत्तर भारतीय मोर्चा प्रदेश सहसंयोजक जया अलीमचंदानी पती यांचे सुंदर दिनोमल अलीमचंदानी यांचे निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. कै. सुंदर अलीमचंदानी हे व्यावसायिक होते. ते वाशी येथील पामबीच मार्गावरील महावीर अमृत येथे आपल्या कुटुंबासह राहत होते. त्यांच्यावर तुर्भे अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी राजकिय, सामजिक क्षेत्रातील मंडळी उपस्थित होते.

### उज्ज्वला जाधव




**मोहोपाडा :** रसायनी रिस येथील आंबडेकरी चळवळीचे कार्यकर्ते व पत्रकार राहुल चंद्रकांत जाधव यांच्या आई उज्ज्वला चंद्रकांत जाधव यांचे अल्पशा आजाराने बुधवारी (दि. २३) निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची दोन मुले, सुना, मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा पुण्यमोदन कार्यक्रम ३ ऑगस्ट रोजी राहत्या घरी रिस येथे होणार आहे. कै. उज्ज्वला जाधव यांचा स्वभाव साधा व मनमिळाऊ होता. त्यांच्या जाण्याने परिवाराने शोक व्यक्त केला आहे.

### बाजीराव परदेशी



**उरण :** पूर्व विभागातील काँग्रेसचे अध्यक्ष माजी जिल्हा परिषद सदस्य तथा रायगड जिल्हा परिषदेतील पक्ष प्रतोद बाजीराव दामा परदेशी (वय ६०) यांचे गुरुवारी (दि. २४) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे कुटुंबीय व चिरनेरवासीयांसह संपूर्ण उरण पूर्व विभागावर शोककळा पसरली आहे. त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी नातेवाईकांसह सर्वच राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी गर्दी केली होती.

### ॲड. नंदा देशमुख



**अलिबाग :** कोकण एज्युकेशन सोसायटीच्या उपाध्यक्ष ॲड. नंदा देशमुख यांचे गुरुवारी (दि. २४) पहाटे १ वा. च्या सुमारास निधन झाले. रुग्णालयातच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ॲड. नंदा देशमुख यांनी गेली १२ वर्षे कोएसोच्या उपाध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. याशिवाय वकिली क्षेत्रातही त्यांनी नाव कमावले होते. अलिबागच्या माजी नगराध्यक्ष स्व. नमिता प्रशांत नाईक यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

# उरणमध्ये बांगलादेशींचा वावर



**उरण : प्रतिनिधी**

उरण विधानसभा मतदारसंघाचा औद्योगिक दृष्ट्या झपाट्याने विकास होत आहे. त्यामुळे रोजगाराच्या शोधार्थ बाहेर गावाहून येणाऱ्या नागरिकांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्याचा फायदा हा बांग्लादेशातील नागरिकांनी उठून आपले बस्तान बसवले आहे. यांची माहिती नवी मुंबई पोलिसांना मिळताच नुकताच उलवे नोड परिसरातून तीन महिला व दोन पुरुष असे एकूण पाच बांग्लादेशातील नागरिकांना जेरबंद केले असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

जेएनपीए बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, सुरू होणारी मुंबई ते उरण रेल्वे सेवा अशा इतर माध्यमातून उरण विधानसभा मतदारसंघाचा औद्योगिक दृष्ट्या झपाट्याने विकास होत आहे.त्यामुळे रोजगाराच्या शोधार्थ बाहेर गावाहून येणाऱ्या नागरिकांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अशा बाहेर गावाहून येणाऱ्या नागरिकांवर स्थानिक ग्रामपंचायत, पोलिस यंत्रणेचा अंकुश न राहिल्याने त्याचा फायदा हा बांग्लादेशिय नागरिकांनी उठून आपले बस्तान बसविण्यास सुरुवात केली आहे.

### उलवे नोड परिसरातून पाच जण ताब्यात

*जासई सह इतर ठिकाणी वास्तव्यास असलेल्या काही बांगलादेशातील नागरिकांवर या अगोदर उरण पोलीस यंत्रणेने कारवाईचा बडगा उगारला होता. नवी मुंबई पोलीस यंत्रणेला उलवे नोड परिसरात काही बांगलादेशातील नागरिक वास्तव्य करत असल्याची माहिती मिळताच त्यांनी तीन महिला व दोन पुरुष असे एकूण पाच बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेऊन त्याची रवानगी जेलमध्ये नुकताच केली आहे.*

एकंदरीत कायदा सुव्यवस्थेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उरण पोलीस, न्हावा शेवा पोलीस आणि मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकारी वर्गाने या घटनेचे गांभीर्य ओळखून भाडेकरुंची माहिती संबंधित घर मालकांकडून घेण्यात यावी तसेच काही कंटेनर यार्डच्या मालकांनी, व्यवस्थापनानी आपला पैसा वाचविण्याच्या उद्देशाने यार्डमधील कामाची हाताळणी करून घेण्यासाठी कंटेनर यार्डमध्ये वास्तव्यास ठेवलेल्या कामगारांची सखोल चौकशी करावी, अशी मागणी जाणकारांकडून करण्यात येत आहे.

## आठवडे बाजारात चोरट्यांचा सुळसुळाट

**पनवेल : वार्ताहर**

आठवडे बाजारात भाजीपाला खरेदीसाठी गेलेल्या महिलांचे साडेतीन ग्रॅम वजनाचे कानातील सोन्याचे झुमके, साडेबारा हजार रुपये आणि एक मोबाईल चोरीला गेल्याचा प्रकार विचुंबे येथे घडला आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विचुंबे येथील पोलीस चौकी जवळील मोकळ मैदानात अनधिकृत भरत असलेल्या आठवडे बाजारात ज्योती अहिरे या भाजीपाला खरेदी करण्यासाठी गेल्या होत्या. या वेळी त्यांच्या पर्स चोरट्याने चोरून नेली. या पर्समध्ये असलेले साडेतीन ग्रॅम वजनाचे सोन्याचे झुमके व साडेचार हजार रुपये चोरट्याने लंपास केले आहे तसेच लक्ष्मी राम रतन गुप्त यादेखील आठवडे बाजारात भाजी घेण्यासाठी गेले असता आठ हजार रुपये आणि मोबाईल असलेली पर्सदेखील चोरट्याने चोरून नेला आहे.

## उड्डाणपुलावरून गाडी कोसळली ; एक जण जखमी

**पनवेल** : शहरातून जाणाऱ्या डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उड्डापूलावरून एका चारचाकी वाहन खाली कोसळल्याची घटना घडली. या घटनेत एक जण जखमी झाल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे. पनवेलजवळील शिवशंभो नाका ते बस स्थानक जाणाऱ्या डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उड्डापूलावरून किया सेलटॉस (एमएच ४६ बीपी १७५५) वाहन एमसीसीएच सोसायटीमधील अंजली प्लाझा इमारतीजवळ खाली कोसळले. या घटनेत गाडीचे नुकसान झाले आहे. तर एक जण जखमी झाला आहे. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांचे तसेच वाहतूक शाखेच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी दाखल झाले होते.



## माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

जाणीव एक सामाजिक संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जाणीव एक सामाजिक संस्था, माता बालसंगोपन मंडळाचे सुतीकागृह व स्वाती ऑप्टीक्स पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी, नेत्रचिकीत्सा व मोफत चश्मे वाटप शिबिर मंगळवारी (दि. २९) आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा प्रभाग क्र. १८ मधील जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



पनवेल महापालिका जवळील गोखले हॉलमध्ये सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत आयोजित या शिबिरामध्ये रक्त तपासणी, आरबीरस शुगर तपासणी, सीबीसी तपासणी, ब्लड प्रेशर तपासणी, ईसीजी, प्राथमिक तपासणी (ताप, सर्दी, खोकला, अंगदुखी व इतर) स्त्रीरोग तपासणी व मार्गदर्शन, नेत्र तपासणी व मोफत चश्मे वाटप तसेच इतर सर्व आजारांवर मोफत सल्ला व तज्ञ डॉक्टरांमार्फत मोफत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या आरोग्य शिबिरात आपले नाव नोंदणीसाठी माजी नगरसेवक नितीन पाटील यांचे जनसंपर्क कार्यालय किंवा प्रसाद कंधारे (८४५१८४२९१९), महेश सरदेसाई (९३२३२६६१६३), प्रसाद हनुमंते (७६६६३२७००९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## एजन्सी करणार घनकचरा गोळा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रातील हॉटेल व्यावसायिकांच्या घनकचरा गोळा करण्यासाठी लहास ग्रीन इंडिया प्रा लिमिटेड या एजन्सीची नियुक्ती केली असून प्रती फ्लॅट मासिक दीडशे रुपये अधिक जीएसटी तर पाचशे चौमी पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या हॉटेल, रेस्टारेंट व समुदाय संस्थेला मासिक प्रती नऊ रुपये किलो जीएसटीप्रमाणे घनकचरा वसुलीला मंजुरी दिली.

याबाबत हॉटेल चालकांनी कचरा संकलन शुल्क माफी देण्याची विनंती पालिकेकडे केली आहे. स्वच्छतेसाठी माझी वसुंधरासारखे विविध उपक्रम राववूनही महापालिकेचा घनकचरा प्रतिदिन वाढत चालल्याने कचरा व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित केले. नागरिकांपेक्षा हॉटेलचा कचरा जास्त असतो. पालिकेने नेमलेली एजन्सी हा कचरा एकत्रित करून त्याची विल्हेवाट लावणार आहे. तिने जागा घेऊन हा प्लांट तयार केला आहे. ज्या हॉटेल आणि रेस्टॉरंट मालकाचा विरोध आहे. त्या हॉटेल व्यावसायिकांनी स्वतःचा कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची सूट पालिकेने दिली आहे.

## वीर वाजेकर महाविद्यालयात सर्प जनजागरुकता अभियान

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर आर्ट्स सायन्स व कॉमर्स महाविद्यालय, महालण विभाग, फुंडेच्या प्राणिशास्त्र विभाग व केअर ऑफ नेचरच्या वतीने तू. ह. वाजेकर हायस्कूल फुंडे येथील विद्यार्थ्यांसाठी नागपंचमी निमित्ताने सर्प समज गैरसमज जनजागरुकता अभियान घेण्यात आले.



एच. एन. पाटील ह्यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली, तर प्राचार्य एस. जी. म्हात्रे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वीर वाजेकर कॉलेजचे प्राणिशास्त्र विभाग प्रमूख, डॉ आमोद ठक्कर यांनी केले.

प्रमुख वक्ते केअर ऑफ नेचरचे राजू मुंबईकर यांनी सर्प हा मांसाहारी प्राणी आहे. त्याला दुध लाह्या देऊन त्याला अपाय करू नये असे आवाहन केले. तसेच सापांचे संदर्भात असलेले गैरसमज ज्यामध्ये साप बदला घेतो, पाठलाग करतो, रुप बदलून येतो, हे सर्व वैज्ञानिक दृष्टिकोनातून कसे चुकीचे आहेत हे विस्तृत पणे समजावून सांगितले. जगात सापांच्या सुमारे तीन हजार जाती आहेत. भारतात साधारणतः २७५ जातीचे साप आढळतात. हे साप तीन प्रकारचे असतात विषारी, निमविषारी व बिनविषारी. आपल्या परिसरात नाग, मण्यार, घोणस, फुरसे, चापडा फक्त एवढेच विषारी साप आहेत. यांना कसे ओळखायचे, त्यांचा खुराक, सवयी, इत्यादींची सविस्तर माहिती दिली. केअर ऑफ नेचरचे अनिल घरत व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन सहभाग नोंदविला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. पंकज भोये, डॉ. श्रेया पाटील, माळी मॅडम, सदानंद म्हात्रे आदींनी मोलाचे सहकार्य केले. शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलाचे अपहरण



**पनवेल** : ओवळे फाटा येथे जावून येतो असे सांगुन त्याच्या ओवळे गावातील राहत्या घरातुन गेलेल्या एका अल्पवयीन मुलाचे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची घटना घडली आहे. या घटनेची तक्रार शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. करण भारत मोरे असे या अल्पवयीन मुलाचे नाव असून त्याचा रंग सावळा, उंची तीन फुट सहा इंच, केस काळे बारीक, चेहरा गोल, डोळे काळे तर अंगात निळा टी-शर्ट व निळी व लाल हाफ पॅन्ट आहे. या मुलांबाबत माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## चंद्रयान-३च्या यशाबद्दल विरूपाक्ष मंदिरात महाआरती

**पनवेल : वार्ताहर**

चंद्रयान-३ च्या 'विक्रम'चे चंद्रावर यशस्वी अवतरण होताच संपूर्ण देशभरात उत्साहाचे वातावरण संचारले आहे. ठिकठिकाणी फटाक्यांची आतषबाजी झाली. चांद्रयान-३ विक्रमचे यशस्वी अवतरण झाल्याची आनंदाची वार्ता कानी पडताच पनवेल येथील श्री.विरूपाक्ष महादेव मंदीरात विरूपाक्ष महादेव मंदिर ट्रस्ट व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी श्री. महादेवासमोर आरती करून भक्ती भावनेने उत्साह आणि जल्लोष साजरा केला. त्यानंतर चंद्रयान ३ च्या यशासाठी फटाके वाजवून आनंदोत्सव साजरा केला.



इस्रोच्या चांद्रयान-३ मोहिमेचा चंद्राच्या पृष्ठभागावर अवतरणाचा दुर्मीळ क्षण अनेक नागरिक समाज माध्यमासह दूरचित्रवाणीवर पाहत होते. चांद्रयान चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरताच पनवेलमधील विरूपाक्ष महादेव मंदिर ट्रस्ट व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी आगळ्यावेगळ्या पद्धतीने आपला आनंद साजरा केला. विरूपाक्ष महादेव मंदीरात महादेवासमोर आरती करून भक्ती भावनेने चंद्रयानच्या यशाचा जल्लोष साजरा केला. त्यानंतर विरूपाक्ष महादेव मंदीरासमोर फटाके वाजवून आनंदोत्सव साजरा केला.

## श्रावणी सोमवारनिमित्त रामेश्वर मंदिरात कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री रामेश्वर महादेव मंदिर देवस्थान, पनवेल येथे श्रावणी सोमवारनिमित्त लघुरुद्र पठाण आणि अभिषेक समारंभ ट्रस्ट तर्फे आयोजित करण्यात येतो. दरवर्षी श्रावण महिन्याच्या दर सोमवारी याचे आयोजन करण्यात येते. यासाठी या मंदिराचे ट्रस्टी उमेश इनामदार, चिन्मय नाईक, प्रसाद हनुमंते, राजेश खरे तसेच सभासदांचे मोलाचे सहकार्य असते.

फार पुरातन आणि भक्तीला पावणारे असे हे मंदिर असून इतर दिवशीही भाविक दर्शनासाठी येत असतातच पण विशेषतः श्रावण महिन्यात मात्र शेकडो भाविकांची दर्शनासाठी रीघ लागलेली असते. याशिवाय पनवेल मधील विविध पक्षाचे पदाधिकारी, नेते सह कार्यकर्ते ही आवर्जून दर्शनाचा लाभ घेत असतात. पौराणिक अश्या या रामेश्वर महादेव मंदिरात भाविक आपला नवस फेडण्यासाठी येत असतात, अशी या मंदिराची आख्यायिका आहे. जागृत देवस्थानांपैकी हे एक स्थान गणले जाते.



## इनरव्हील क्लबतर्फे विद्यार्थिनींसाठी सॅनिटरी पॅड मशीन

**पनवेल : वार्ताहर**

समाज उपयोगी कामे करण्यात इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउन चे पाऊल नेहमीच पुढे असते. पनवेल येथील के. वि. कन्या या मुलींच्या शाळेत नुकतेच सॅनिटरी पॅड वेंडिग मशीन आणि सॅनिटरी पॅड डिस्पोजेबल मशीन बसवण्यात आले. दोन्ही मशिन विद्यार्थीनिंसाठी खूप उपयुक्त आहेत. यासाठी शाळेचा शिक्षक वर्ग आणि विद्यार्थीनींनी समाधान व्यक्त करून क्लबचे आभार मानले.



हा महत्त्वपूर्ण उपक्रम इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउनच्या प्रेसिडेंट सई पालवणकर यांनी क्लब मेंबर्स यांच्या सहकार्याने पूर्ण केला. या वेळी डॉ. जयश्री पाटील यांनी उपस्थित विद्यार्थिनींना त्यांच्या भावी आयुष्यासाठी करिअर मार्गदर्शन करताना नर्सिंग कोर्स विषयी बहुमोल मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींच्या शंकांचे खूप चांगल्याप्रकारे निरसन केले.

या वेळी प्रेसिडेंट सई पालवणकर, सेक्रेटरी डॉ. राजश्री बागडे, अर्चना फके, डॉ. प्रीती गुरमे,माधुरी कांडपिळे, डॉ. जयश्री पाटील, कल्पना नागावकर, प्रतिभा लादे आदी सभासद उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल डिस्ट्रिक्टकडूनही क्लबचे कौतुक करण्यात आले.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालय आवारात औषधी वनस्पतींची लागवड

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात गुरुवारी (दि. २५) नेचर्स क्लबतर्फे महाविद्यालयाच्या आवारात औषधी वनस्पतींचे रोपण करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने अर्जुना, कडुलसा, हिरडा, करंज, आवळा व कडूलिंब इतरही वनस्पतींचा समावेश होता.

या उपक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या परिसरात प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून झाली व जास्तीत जास्त औषधी वनस्पती लागवडींवर भर देण्यात आला. या उपक्रमात सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, पदवी, विभागाचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. पूजा लांजेकर (समन्वयक, नेचर्स क्लब), डॉ. दीपिका हसीजा, डॉ. धनवी आवटे व प्रा. शिल्पा पाटील आदींनी परिश्रम घेतले. यापूर्वी जून महिन्यात वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात आली होती व यात ५० औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली होती.



## एपीएमसी परिसरात मृतदेह आढळला

**पनवेल : वार्ताहर**

शहरातील रायगड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात एका ५० वर्षीच्या अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. मयत व्यक्तीच्या नातेवाइकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

मयत व्यक्तीची उंची ५० ते ५५ वर्षे असून त्याची उंची ५ फूट ४ इंच, बांधा सडपातळ, रंग सावळा, चेहरा उभट, डोक्याचे व मिशीचे केस काळे व पांढरे, नाक सरळ, डोळे बारीक काळे तर अंगात पांढरा शर्ट व काळी फुल पॅन्ट आहे.

या व्यक्तीबाबत कोणास काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेटे (८६०५९८८१००) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## 'पंचम वेद'तर्फे श्रावणगीत कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संगीत क्षेत्रात अग्रेसर असलेल्या 'पंचम वेद' संस्थेच्या वतीने श्रावणगीत या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ संगीतकार विजय मनोहर यांच्या संकल्पनेतून नवीन पनवेल येथील कृष्णा गार्डन गृहसंकुलामधे झालेल्या या कार्यक्रमाला ज्येष्ठ शास्त्रीय गायक पं. मेघनाथ कोल्हापुरे, गायिका ॲड. सुरेखा भुजबळ व ब्राह्मण सभेच्या अध्यक्ष दीपाली जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.



पनवेल परिसरातील प्रसिद्ध गायकांसह नवोदित गायकांचाही या कार्यक्रमात सहभाग होता. सहभागी कलाकारांनी मराठीहिन्दी श्रावणगीत, वर्षागीत, नाट्यगीत, भावगीत, गवळण, करावके व शास्त्रीय नृत्य आदी विविध कलाप्रकारांचे सादरीकरण करून रसिकांची मने जिंकली. निषाद मनोहर व सान्वी अंबेकर या बालकलाकारांचे गीत व नृत्य कार्यक्रमाचा प्रमुख आकर्षणबिंदू ठरला.

या गायकांना विजय मनोहर यांनी कीबोर्ड, महेश घाटे यांनी संवादिनी, विनायक प्रधान व अमोल खासनीस यांनी तबला, ओंकार भुवड यांनी ढोलकी, प्रवीण भोपी यांनी ऑक्टोपॅड, ॲड. अतुल जोशी यांनी तालवाद्यसाथ केली. शेखर अंबेकर व पर्णिका भडसावळे-जोशी यांनी अभ्यासपूर्ण निवेदनाने कार्यक्रम अधिक रंगतदार केला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेधा, डॉ. निखिल व डॉ. वीणा मनोहर यांनी मोलाचे योगदान दिले.

> **श्रावण मासाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रथितयश गायकांसोबत नवोदित कलाकारांनाही 'पंचमवेद' संस्थेच्या वतीने सन्मानपूर्ण व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो.**
>
> **-विजय मनोहर, पंचम वेद**

## संपादकीय

# रोजचे रडगाणे

आमचे पक्ष भाजपनेच फोडले असे रडगाणे गेले अनेक दिवस महाराष्ट्राचे मतदार ऐकत आहेत. खरे तर या रडगाण्याचा आता सगळ्यांनाच कंटाळा येऊ लागला आहे.

**मोगलांच्या फौजांच्या राहुट्यांचे कळस कापून नेणाऱ्या संताजी-धनाजी या रणमर्दांची दहशत दुश्मनाने इतकी खाल्ली होती की मोगली घोड्यांना पाणी पिताना देखील संताजी-धनाजी यांचे चेहरे दिसत असत आणि ते बिथरून जात असत अशी आख्यायिका इतिहासामध्ये आढळते. महाराष्ट्रामध्ये उरलीसुरली उद्धव सेना आणि शिल्लक राहिलेली राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांना भारतीय जनता पक्ष रात्री-अपरात्री दुस्वप्नामध्ये दिसू लागला आहे. भाजपचा विश्वासघात करून जनमत धुडकावून लावत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत हातमिळवणी करून सत्ता काबीज केली. अशाप्रकारे लबाडीने प्राप्त केलेली सत्ता टिकाऊ नसते हे सर्वांनाच माहित होते, तसेच घडले. मुख्यमंत्रीपदाची खुर्ची मिळूनही उद्धव ठाकरे यांनी घरात बसण्याची सवय काही सोडली नाही. पक्षातील नेत्या-कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतल्या नाहीत. इतकेच नव्हे तर आपल्या पक्षातील नाराज नेत्यांचे म्हणणेदेखील कधी ऐकून घेतले नाही. त्याची परिणती अखेर पक्ष फुटण्यामध्ये झाली. मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे विराजमान झाले. आपल्या पक्षातील फुटीला संपूर्णत: आपणच जबाबदार आहोत याचा आत्मसाक्षात्कार ठाकरे यांना कधी होणार कोण जाणे! अजुनही पक्षफुटीचे खापर ते भाजपवरच फोडत आहेत. उरल्यासुरल्या ठाकरे गटाच्या काही नेत्यांची आणि माजी नगरसेवकांची बैठक नुकतीच शिवसेनाभवनात पार पडली, त्या वेळी ठाकरे यांनी भाजपवरच तोंडसुख घेतले. मनात आणले असते तर भाजपबरोबर जुळवून घेता आले असते, परंतु ते आपल्या नीतीमत्तेत बसणारे नाही असे त्यांनी कार्यकर्त्यांना सांगितले असे समजते. मनात येईल तेव्हा भाजपला सोडचिठ्ठी द्यायची आणि मनात येईल तेव्हा जुळवून घ्यायचे हे अजबच तत्वज्ञान म्हणायचे. भाजपसारखा शिस्तबद्ध पक्ष म्हणजे 'आओ-जाओ घर तुम्हारा' असा बिना खिडक्या-दरवाजांचा पडका वाडा नव्हे. त्यामुळे ठाकरे यांची ती दर्पोक्ती हास्यास्पद वाटते. पक्षाची वाट तर लागलीच आहे, त्याचे खापर भाजपवर फोडले की आपण नामानिराळे राहावयास मोकळे ही वृत्ती आत्मघातकी म्हणावी लागेल. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्येही जवळपास अशीच स्थिती आहे. काही महिन्यांपूर्वीच राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांनी बहुतेक सारा विधिमंडळ पक्ष सोबत घेत सत्तेचा गड गाठला. त्यांच्या या निर्णयाला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख व जुनेजाणते ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा आशीर्वाद असावा अशी अटकळ बांधली जात होती, परंतु तशी परिस्थिती नाही हे आता कळून येऊ लागले आहे. आपले छायाचित्र अजित पवार गटातील नेत्यांनी सभास्थानी वापरू नये असा कडक इशारा शरद पवार यांनी दिल्यानंतर त्यांची छायाचित्रे न वापरण्याचा निर्णय अजितदादांच्या पाठिराख्यांनी घेतला आहे. मूळ पक्षात उरलेले ज्येष्ठ नेते जयंत पाटील लवकरच भाजपवासी होतील असे भाकित संजयकाका पाटील यांनी एका सभेत केले आहे. एवढे घडूनही आमच्या पक्षात फूट पडलेली नाही असाच दावा राष्ट्रवादीतर्फे केला जात आहे. भाजपने तीन वेळा आपला पक्ष फोडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप राष्ट्रवादीकडून केला जात आहे. पक्ष सोडणारे नेते लहान बाळे नाहीत, एवढे तरी भान या नेत्यांनी ठेवावे. भाजपसारखा पक्ष स्वयंशिस्तीच्या जोरावर मोठा झाला आहे, फोडाफोडीमध्ये त्याला स्वारस्य नाही.**

# अलिबागमधील प्रस्तावित धरणे साकारणे काळाची गरज



रायगड जिल्ह्यात अनेक प्रकल्प रखडले आहेत. अलिबाग तालुक्यातील रामराज विभागातील सांबारकुंड व सारळ परिसारातील सारळ-घोळ ही दोन धरणे त्यापैकी आहेत. हे दोन्ही प्रकल्प रखडले आहेत. या दोन्ही धरणांचे घोंगडे भिजत पडले आहे. ४७ वर्षांहून अधिक काळ झाला तरी सांबरकूंड धारणाचे काम सुरू होत नाही. मागील दोन वर्षापासून सांबरकूंड धरणाबाबत शासनान प्रयत्न सुरू केले होते. त्यामुळे हे धरण होईल असे वाटत होते. मात्र पुन्हा या धरणाचा प्रस्ताव लटकला आहे. तालुक्यातील रामराज भागात १९६२पासून प्रस्तावित असलेले सांबरकुंड धरण २०२३ साल उजाडले तरी रखडले आहे.

१९६२ साली ११ कोटी रुपये खर्च करून सांबर कुंड धरण बांधले जाणार होते मात्र आता या धरणाचा खर्च वाढला आहे. महाविकास आघाडी सरकारने ७५० कोटी मंजूर केले होते, तर आता महायुती सरकारने अजून अडीच पट भर टाकली आहे. आता हा खर्च दोन हजार कोटींवर पोहचला आहे. अलिबाग तालुक्याला एमआयडीसी आणि उमटे, तीनविरा या धरणातून नागरिकांना पाणी पुरवठा रोज होत असतो. साधारण २५ ते ३० द. ल. घ. मी. पाणी तालुक्याला लागते. मात्र वेगाने होत असलेल्या शहरीकरणामुळे भविष्यात पाण्याची समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे खर्च वाढला तरी हे धारण होणे काळाची गरज आहे.

गेली ४७ वर्षे अलिबाग तालुक्यतील जनता या धनणाची वाट पाहता आहे. १९७३मध्ये अलिबागचे काँग्रेसचे तत्कालीन आमदार स्व. ना. का. भगत यांनी विधानसभेत सांबरकुंड धरणाची मागणी केली होती. याला ४७ वर्षे झाली. तरीदेखील हा प्रकल्प प्रत्यक्षात येऊ शकलेला नाही. या प्रकल्पाची पहिली प्रशासकीय मान्यता २८ जुलै १९८२ देण्यात आली. दुसरी सुधारीत मान्यता १६ मार्च १९९५, तिसरी मान्यता ६ ऑक्टोबर २००१, चौथी मान्यता २०१२-१३मध्ये व पाचवी सुधारित मान्यता ७४२ कोटी ६ मे २०२० देण्यात आली. दाने वर्षपूर्वी पुन्हा जनसुनावणी सुरू झाल्यामुळे हे धरण पुन्हा चर्चेत आले. प्रस्तावित धरण परिसरातील जांभुळवाडी, सांबरकुंडवाडी आणि खैरवाडी या गावांचे पुनर्वसन रामराज येथील राजेवाडी येथे करण्यात येणार आहे.

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अनेक वर्षे हे धरण रखडले आहे. स्व. ना. का. भगत यांनी प्रथम या धरणाबाबत पुढाकार घेतला. त्यानंतर स्व. मधुकर ठाकूर यांनी प्रयत्न केले. आमदार महेंद्र दळवी यांनी सांबरकुंड धरण होण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे या धरणाला चालना मिळाली आहे. प्रशासकीय स्तरावर हालचाली सुरू झाल्या. बैठका होऊ लागल्या. शेतकऱ्यांना २०१३च्या निवाड्यानुसार मोबदला घेण्यासाठी नोटीस दिल्या होत्या, मात्र त्या शेतकऱ्यांनी स्वीकारल्या नाही आहेत. त्यामुळे पुढील प्रक्रिया थांबलेली.

शेतकऱ्यांना आपली घर सोडावी लागणार आहेत. शेतकरी विस्थापित होणार आहेत. येथील शेतकऱ्यांचा धरणाला विरोध नाही. शेतकऱ्यांना मिळणारा मोबदला अत्यल्प असल्याने तो घेण्यास त्याचा विरोध आहे. धरणग्रस्त होणाऱ्या ग्रामस्थांना मिळणारा मोबदला हा अत्यल्प असल्याने तो नव्या भूसंपादन कायद्यानुसार द्या, अशी मागणी त्यांची आहे. आताच्या बाजारभावानुसार जमिनीचा मोबदला मिळावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

अलिबाग तालुक्यात उमटे धरणातून एक लाख नागरिकांना पाणी पुरवठा होत आहे, मात्र हे धरण ४० वर्षे झाले असून गाळाने भरले आहे. या धरणाची पाणी साठवण्याची क्षमता कमी झाली आहे. तालुक्याला पाणी पुरवठ्याचा दुसरा स्त्रोत आहे. एमआयडीसी पाण्याचा आहे. तालुक्यातील ६० ते ७० टक्के जनता ही एमआयडीसी पाण्यावर अवलंबून आहे. अलिबाग तालुक्यात पावसाळ्यातदेखील काही गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. भविष्यात अलिबाग तालुक्यात मोठे प्रकल्प येणार आहेत. तेव्हा पाण्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे अलिबाग तालुक्यात मोठे धरण होणे आवश्यक आहे.

रामराज ग्रामपंचायत हद्दीत खैरवाडी, जांबुळवाडी, सांबरकुंड वाडी या परिसरात सांबरकुंड धरण मध्यम प्रकल्प होणार आहे. या धरणामुळे तालुक्यातील ३३ गावांमधील दोन हजार ५२८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या धरणामुळे अलिबाग तालुक्याचा चेहरामोहरा बदलेल. त्यामुळे हे धरण व्हायला हवे.

अलिबाग तालुक्यातील दुसारा एक प्रकल्प म्हणजे सारळघोळ. स्व. मधुकर ठाकूर आमदार असताना त्यांनी सारळघोळ प्रकल्पाबाबत प्रयत्न केले होते, परंतु नंतर मात्र हा प्रकल्प रखडला. सारळ-घोळ प्रकल्पाची चर्चाच होते. प्रत्यक्षात काही होत नाही. हा प्रकल्प झाला तर अलिबाग तालुक्यातील खारेपाट विभागाची पाण्याची समस्या सुटणार आहे. या भागातील काही गावांना पावसळ्यातदेखील टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. मांडवा-रेवस परिसारातील गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या आहे. भविष्यात रेवस-करंजा पूल होणार आहे. त्यामुळे धनदांडग्यांनी या भागात जमीन खरेदी करून ठेवल्या आहेत. या भागात मोठे गृहप्रकल्प येणार आहेत. लोकसंख्या वाढणार आहे. त्यामुळे पाण्याची समस्या अधिक जटील होणार आहे. त्यामुळे सारळघोळ प्रकल्प होणे गरजचे आहे. सांबरकुंड व सारळघोळ ही दोन्ही धरण व्हायला हवीत, ती गरज आहे.




# देशभरात लवकरच सुरू होणार कार टेस्टिंग



केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत मंगळवारी भारत एनसीएपीचे लाँचिंग झाले. देशातील कारची सुरक्षा वाढवण्याच्या दृष्टीने उचलण्यात आलेले हे महत्त्वाचे पाऊल ठरेल. देशात दरवर्षी एक लाखांहून अधिक लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू होतो. अशा परिस्थितीत या निर्णायाचा सुरक्षेच्या दृष्टीने सगळ्यांनाच मोठा फायदा होणार आहे.

आता आपल्याच देशात कारची क्रॅश टेस्टिंग करून त्यानुसार सेफ्टी स्टार रेटिंग देणे शक्य होणार आहे. १ ऑक्टोबरपासून कार उत्पादकांना या प्रणाली अंतर्गत सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांच्या कारला स्टार रेटिंग मिळेल. यामध्ये पाच स्टार ते सिंगल स्टार रेटिंगचा समावेश असेल.

सेफ्टी स्टँडर्डची पूर्तता करणाऱ्या कारला त्यानुसार स्टार रेटिंग देण्यात येईल. स्टार रेटिंगमुळे गाड्यांच्या किमती वाढण्याची शक्यता असून कारच्या किंमती किती पटीने वाढेल हे इत्यकात कळू शकणार नाही. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, सध्या कार उत्पादक कंपन्यांसाठी सेफ्टी स्टार रेटिंग अनिवार्य नाही. हा पर्याय सध्या इच्छुकांसाठी असणार आहे. ते स्वेच्छेने त्यांच्या कारचे सेफ्टी ऑडिट करून घेऊ शकतात. यापूर्वी ही ऑडिट परदेशात करण्यात आली होती. देशात दररोज १०००हून अधिक रस्ते अपघातांमध्ये ४०० लोकांचा मृत्यू होतो. कारचे स्टार रेटिंग ही स्थिती सुधारण्यास मदत करेल.

इंडिया एनसीएपी कोणत्याही टप्प्यावर ग्लोबल एनसीएपीपेक्षा कमी नसणार. भारतीय रस्ते, ड्रायव्हिंग पॅटर्न आणि इतर परिस्थिती लक्षात घेऊन त्याची रचना करण्यात आली आहे. भारतात करावयाच्या क्रॅश टेस्टिंगसाठी हेड-ऑन, साइड क्रॅश आणि इतर प्रकारचे रस्ते अपघात लक्षात घेऊन या चाचण्या केल्या जातील.

यामध्ये, समोरासमोर, साईड आणि पोल साईड इफेक्ट तपासण्यासाठी चाचण्या तीन, चार आणि पाच स्टार रेटिंगमध्ये अनिवार्यपणे केल्या जातील. गाड्यांवर स्टार रेटिंग स्टिकर्स लावले जातील. जेणेकरून ग्राहकांना कार खरेदी करताना स्टार रेटिंगची बघून घेणे सोयीस्कर ठरेल.

# गीतकार व संगीतकार अशोक पत्की



**निमित्त**

अशोक पत्की यांनी आपल्या सहजसुंदर स्वररचनांच्या बलस्थानाने भावसंगीत, मराठी चित्रपटसृष्टी, नाट्यसृष्टी आणि दूरदर्शन-आकाशवाणी या सर्व माध्यमांमध्ये स्वतःची संगीतकार म्हणून ओळख निर्माण केली आहे. त्यांचा जन्म मुंबई येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडिल गोविंद पत्की गिरणीमध्ये नोकरीला होते. शंकर-जयकिशन, रोशन, नौशाद यांच्या कार्यक्रमात त्यांची बहीण मीना पत्की गात असे. त्यांना सोबत करीत असतानाच पत्की यांचा संगीत क्षेत्राशी जवळून संबंध आला. गाण्याची उपजत समज आणि शिकण्याची ऊर्मी यामुळे त्यांनी पं. मनोहर चिमोटे यांच्याकडे वर्षभर हार्मोनियम वादनाचे धडे गिरवले. आकाशवाणीतून नव्याने उदयाला आलेल्या जिंगल्स या प्रांतात पत्की यांनी २० वर्षे संगीतकार आणि वादक म्हणून काम केले आहे. जिंगल्स तयार करताना जाहिरातदारांची अपेक्षा पूर्ण करण्याच्या कसरतीमध्ये स्वरांना आणि मेलडीला असलेले प्राधान्य राखण्याकडे एक संगीतकार म्हणून पत्की यांचा कल होता. विविध उत्पादनांच्या शेकडो जिंगल्स पत्की यांनी आजवर केल्या आहेत. राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित मिले सूर मेरा तुम्हारा ही सर्वाधिक लोकप्रिय ठरलेली जिंगल. साक्षरता प्रसारासाठी केलेली कविता कृष्णमूर्ती यांच्या स्वरातील पूरबसे सूर्य उगा फैला उजियाला ही जिंगलसुद्धा स्मरणीय झाली.

पं. जितेंद्र अभिषेकी यांच्यामुळे अशोक पत्की यांचा नाटकाच्या संगीताशी परिचय झाला. मत्स्यगंधा ते तू तर चाफेकळी या नाटकापर्यंत पत्की जितेंद्र अभिषेकी यांच्याबरोबर साहाय्यक संगीतकार म्हणून काम करीत होते. दी गोवा हिंदू असोसिएशन या संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त आटपाटनगरची राजकन्या हे रत्नाकर मतकरी लिखित नाटक स्वतंत्रपणे संगीत दिग्दर्शनासाठी पत्की यांना मिळाले. त्यानंतर बिऱ्हाड-बाजलं, अखेरचा सवाल, तसे आम्ही सज्जन, दिसतं तस नसतं या नाटकांनाही त्यांनी संगीत दिले.

सुयोग या नाट्यसंस्थेचे मोरूची मावशी हे नाटक पत्की यांनी १९८५ साली संगीत दिलेले पहिले नाटक. या यशानंतर भ्रमाचा भोपळा, ब्रह्मचारी, लग्नाची बेडी यांसारखी सुयोगची हलकी फुलकी नाटकेही अशोक पत्की आणि प्रशांत दामले यांच्या समीकरणाने यशस्वी झाली.

गांधी विरुद्ध गांधी या गंभीर नाटकाला पत्की यांनी दिलेल्या पार्श्वसंगीताची दखलही जाणकारांनी, समीक्षकांनी घेतली. सुयोग, मुंबई मराठी साहित्य संघ, गणरंग, कलावैभव, चित्रलेखा, श्रीचित्र अशा नामांकित नाट्यसंस्थेच्या २५०पेक्षाही जास्त नाटकांना पत्की यांनी संगीत दिले आहे. या प्रयोगातूनच जादू तेरी नजर हा ऑपेरा संगीतबद्ध झाला.

केतकीच्या बनी या गाण्यामध्ये बंगाली संगीतातील संचारीचा प्रयोग केला आणि या गाण्यांमुळे मेलोडियस संगीतकार म्हणून त्यांची एक स्वतंत्र ओळख निर्माण झाली.

अशोक पत्की यांनी गीतकार शांताराम नांदगावकर यांच्याबरोबरही अनेक वर्षे काम केले. आता नव्या पिढीशी आणि पर्यायाने बदलत्या संगीत प्रवाहाशी ते जुळवून घेत आहेत. मालिकांच्या शीर्षकगीतांना दिलेले संगीत अशोक पत्की यांच्या कारकिर्दीमधील महत्त्वपूर्ण योगदान आहे. गोट्या, बीज अंकुरे अंकुरे, पिंपळपान, आभाळमाया, वादळवाट, मानसी, अधुरी एक कहाणी ही शीर्षकगीते घरोघरी पोहोचली. अशोक पत्की चाळीस वर्षांपेक्षा जास्त काळ संगीत सृष्टीमध्ये काम करताना नव्या आणि जुन्या पिढीच्या संगीतामध्ये दुवा जोडणारे आणि दोन्ही पिढ्यांना सामावून घेणारे संगीतकार आहेत.

**-नेहा वैशंपायन,**
**महाराष्ट्र नायक**

**क्लिक...क्लिक...!**






**पनवेल : गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपल्याने येथील युवानंद ढोल-ताशा पथकाचा सराव जोरात सुरू आहे. त्यातच बुधवारी चांद्रयान-३चे यशस्वी लँडिंग झाल्याचा आनंदोत्सव पथकाच्या सदस्यांनी विशेष वादन करून साजरा केला.** (छाया : करण वाहुळकर)

## आरोग्य प्रहर

# कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी करा 'या' पदार्थांचे सेवन




शरीरात जास्त प्रमाणात असेलेले कोलेस्ट्रॉल अनेक घटकांवर अवलंबून असते. बदलती जीवनशैली, लठ्ठपणा, वाढते वय आणि आरोग्याच्या इतर समस्यांमुळे शरीरात कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढते. ज्यांच्या शरीरात मोठ्या प्रमाणात कोलेस्ट्रॉल असते, त्यांना हृदयरोग होऊ शकतो. खाण्या-पिण्याकडे आणि योग्य जीवनशैलीकडे लक्ष न दिल्यास कोलेस्ट्रॉल वाढू शकते. शरीरात दोन प्रकारचे कोलेस्ट्रॉल असते ते म्हणजे एक चांगले आणि दुसरे वाईट. खराब कोलेस्ट्रॉल शरीराला एक नाही तर अनेक प्रकारे हानी पोहोचवते. वाढणारे कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी आहारात बदल करता येणे शक्य असते. आज आपण असे काही खाद्यपदार्थ जाणून घेणार आहोत ज्यांचे सेवन केल्याने वाईट कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते.

**सोयाबीन** : सोयाबीन किंवा सोया चंक्स वाईट कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी प्रभावी ठरतात. यापासून शरीराला सोया प्रोटीन मिळते हे कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते, तसेच तुम्ही आहारात तुम्ही सोया दूध, टोफू आणि अन्य सोया प्रॉडक्ट्सचा समावेश देखील करू शकता.

**ओट्स** : ओट्सचा समावेश अनेकदा नाश्त्यामध्ये केले जातो. ओट्समुळे शरीराला खूप फायबर मिळते. ज्यामुळे पोट खूप वेळ भरलेले राहते. याचा फायदा वजन कमी होण्यास मदत होते. ओट्समध्ये विरघळणारे फायबर असते जे खराब कोलेस्ट्रॉल कमी करते आणि कोलेस्ट्रॉलला रक्तात शोषून घेण्यापासून प्रतिबंधित करते.

**फायबरयुक्त फळे** : पेक्टिन हा एक प्रकारचा विरघळणारे फायबर आहे जे कोलेस्ट्रॉल काढून टाकण्यासाठी उपयुक्त आहे. यासाठी फायबरयुक्त फळांचा समावेश आहारात करावा. सफरचंद, द्राक्षे, स्ट्रॉबेरी आणि संत्री लिंबूवर्गीय फळांमध्ये पेक्टिन असते.

**ड्राय फ्रुट्स** : हाय कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी तुम्ही सुका मेवा देखील खाऊ शकता. कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी बदाम, शेंगदाणे, अक्रोड यांसारख्या सुक्या मेव्याचा आहारात समावेश केला जाऊ शकतो.

**(दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# नेत्रावती, दिवा-सावंतवाडी गाडीला रोह्यात थांबा

## रेल्वे प्रवाशांना प्रशासनाकडून दिलासा

**रोहे : प्रतिनिधी**

कोरोना महामारीच्या वेळी नेत्रावती एक्स्प्रेस व दिवा-सावंतवाडी या गाडीचा रोहा रेल्वे स्थानक येथील थांबा रद्द करण्यात आला होता. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत होती. ही गैरसोय लक्षात घेता रेल्वे प्रशासनांनी २५ ऑगस्टपासून या दोन्ही गाड्यांना पुन्हा रोहा रेल्वेस्थानकात थांबा देण्यात आला आहे. त्यामुळे या गाड्यांचा लाभ मुंबईकडे व कोकणाकडे जाणाऱ्या प्रवाशांना होणार आहे. त्यांचा प्रवास आहे जलद होणार आहे.

रोहा रेल्वे स्थानकात नेत्रावती व दिवा सावंतवाडी या दोन्ही गाड्या पूर्वी थांबत होत्या, परंतु कोरोना महामारीच्या काळात या दोन्ही गाड्यांचा थांबा रेल्वे प्रशासनाकडून रद्द करण्यात आला होता. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत होती. ही गैरसोय लक्षात घेत रेल्वे प्रवासी महासंघाचे रायगड जिल्हा अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे यांनी प्रवासांच्या हितासाठी रेल्वे प्रशासनाकडे या गाड्यांना थांबा मिळवण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला यश मिळाले असून या दोन्ही गाड्या २५ ऑगस्टपासून रोहा रेल्वे स्थानकात थांबणार आहेत.

या दोन्ही गाड्या रेल्वे स्थानकात थांबणार असल्यामुळे समाधान व्यक्त करण्यात आले आहे. तर रेल्वे प्रवासी महासंघ रोहा रायगडच्या वतीने रेल्वे प्रशासनाचे आभार मानण्यात आले आहेत.

कोरोनाच्या काळात दिवा सावंतवाडी व नेत्रावती एक्स्प्रेस या दोन्ही गाड्यांचा थांबा रोहा रेल्वे स्थानकात रद्द करण्यात आला होता. महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे अध्यक्ष अभिजित धुरत यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा रायगड महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाच्यावतीने रेल्वे प्रशासनाकडे या दोन्ही गाड्यांचे थांबवण्यासाठी २ मार्चपासून पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला होता.त्याला यश मिळाले असून २५ ऑगस्ट पासून रोहा रेल्वे स्थानकात या दोन्ही गाड्या थांबणार असल्यामुळे रेल्वे प्रशासनाचे प्रवासांच्यावतीने मनःपूर्वक आभार, असे महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघ रोहा रायगड अध्यक्ष सुर्यकांत वाघमारे यांनी सांगितले.




> **प्रवाशांच्या हिताच्या दृष्टीकोनातून दिवा सावंतवाडी व नेत्रावती एक्स्प्रेस या गाड्यांना रोहा स्टेशनवर थांबा देण्यात आला असून त्याचा फायदा प्रवाशांनी घ्यावा.**
> **-अजयकुमार मिना, रोहा रेल्वे स्टेशन मास्तर**

## कर्जतमध्ये झाडाला लागली आग

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ वन विभागाच्या कार्यालय परिसरात असलेल्या झाडाने अचानक पेट घेतला. विजेच्या तारांच्या खाली झाडाच्या फांद्यांमधून आगीचे लोळ दिसू लागले होते. वन कर्मचाऱ्यांनी महावितरण कार्यालयाशी संपर्क साधून वीज खंडित केली आणि त्यामुळे झाडाला लागलेली आग विझू लागली.

हिरवेगार असलेल्या झाडाने पेट घेतल्याने नेरळ खांडा मैदान भागातील परिसरात राहणारे लोक एकत्र जमा होऊ लागले. कार्यालयाच्या आवारात वनपाल एस.एस. म्हात्रे बाहेर आरडाओरड पाहून तात्काळ आपल्या कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना एकत्र केले आणि महावितरण कंपनीला संपर्क केला. त्यावेळी महावितरण कंपनीनेदेखील तत्परता दाखवून नेरळ खांडा मैदान भागातील वीज खंडित केली.

वीज खंडित होताच झाडाने घेतलेला पेट कमी होत गेला. अर्ध्या तासाने झाडाला लागलेले आगीचे लोळदेखील बंद झाले आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.



## चांद्रयान-३ : खोपोलीत रॅली

**खोपोली : प्रतिनिधी**

बुज हास्य क्लब खोपोली तर्फे चांद्रयान - ३च्या यशस्वी मोहिमेचा आनंद बाजारपेठेतुन विजयी रॅली काढून साजरा करण्यात आला. बुज हास्य क्लबचे बाबूभाई ओसवाल यांच्या नेतृत्वाखाली खोपोली बाजारपेठेतून रॅली काढून चांद्रयान -३ च्या यशस्वी मोहीमेचा आनंद साजरा करण्यात आला.

या वेळी बूज हास्य क्लबचे प्रभारी अध्यक्ष विजय घोसाळकर, सविता जाधव, हेमंत नांदे, दीपक मालुसरे, राजेंद्र ओसवाल, पाठक अर्चना दळवी, शोभा धायगुडे, संतोष वाघ, सुनील नांदे, राजेंद्र दलाल, अश्विनीकुमार, कांगे सुमिता महर्षी, भोईर, शशिकला पवार, सुरेखा शिंदे, विजय पाटिल, अमृता आंग्रे, नीता देशमुख, सुवर्णा खाताळ, सुभाष शहासाने, सुरेंद्र जाधव ई सदस्य उपस्थित होते.



## श्री स्वामी भक्तांसाठी चिन्मय पादुका पूजन, अभिषेक सोहळा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ पादुका व अभिषेकासाठी अक्कलकोटहुन चिन्मय पादुका चौक जवळील आई बाबा फाउंडेशन जांभळे फार्म हाऊस येथे आणण्यात आले.

पादुकांचे आगमन होताच दर्शन सोहळा धार्मिक परंपरे नुसार मोठ्या उत्साहात पार पडला. स्वामींच्या पादुकांचे आगमन हे खरोखर एक सुखद प्रसन्न घटना आहे. या निमित्ताने आई बाबा फौंडेशनचे संस्थापक प्रवीण नवरे व त्यांच्या धर्म पत्नी मिनाक्षी नवरे यांच्याहस्ते स्वामींच्या पादुकांचे अभिषेक व पूजन करण्यात आले. त्यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच इतर क्षेत्रातील नामांकित मान्यवर, नवंवधूवर अनेक परिसरात नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून स्वामी भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला.




## गवत विक्रीतून रोजगाराचा प्रश्न मार्गी

**खोपोली : प्रतिनिधी**

सर्वत्र ठिकाणी शेतीची कामे पूर्ण झाल्यामुळे आदिवासी बांधवांच्या हाताला कोठेच काम मिळेनासे होत,असल्यामुळे, पावसाळ्यात निर्माण झालेले गवत आदिवासी यांना रोजगार मिळून देत आहे. ग्रामीण भागात शेतजमीन शिवाय बराचसा भाग ओसाड असतो. याच ओसाड जमिनीवर उगवणारे गवत कापून ते विक्री करीत असल्याचे चित्र सध्या तालुक्याच्या ठिकाणी पहावयास मिळत आहे.

आदिवासींना आपला उदरनिर्वाह कसा करायचा? ही चिंता सातत्याने भेडसावत असते, मात्र दरवर्षी पावसाळ्यामुळे तयार होणाऱ्या गवतामुळे आदिवासी यांना रोजगाराचा प्रश्न सुटत असतो.सध्या गवताला मोठी मागणी असल्यामुळे रस्त्याच्या बाजूला निर्माण झालेले गवत आदिवासी कापून त्याची विक्री करीत आहे. शहरातील मोठे तबेलेवाले व इतर व्यक्ती मोठ्या प्रमाणात गवताची खरेदी करत असून यातून त्यांचा उदरनिर्वाह होत आहे.

आदिवासी समाज हा दुर्गम अशा डोंगराळ भागामध्ये राहत असतो, मात्र पावसाळ्यात या माळरान अथवा डोंगराळ भागात मोठ्याप्रमाणावर गवत निर्माण होत असते. त्याचबरोबर ज्या शेतामध्ये लागवड केली नाही. त्या ठिकाणीसुद्धा गवत निर्माण होत असते. यांची विक्री करून घरचे भागवणे सोपे जात आहे. असे मत आदिवासी बांधव यांनी व्यक्त केले.



## पदभरतीत रहिवाशांना प्राधान्य द्यावे; भाजपच्या नरेश कोकरे यांची मागणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील प्रतिष्ठित अशी ग्रुप ग्रामपंचायत वाशी येथील क्लर्क या पदाची जागा ही करिवणे येथील रहिवाशांना प्राधान्य देऊन रिक्त जागा भरावी, अशी मागणी दक्षिण रायगड भारतीय जनता युवा मोर्चा चिटणीस नरेश कोकरे यांनी केली आहे.

दरम्यान, करिवणे तेथील एका तरुणाला किंवा तरुणीला ग्रुप ग्रामपंचायत वाशी येथील क्लर्क पदासाठी रिकामी असलेली जागा ही देण्यात आली तर एका तरुणाला किंवा तरुणीला रोजगार मिळेल आणि असे हे झाले पाहिजे, याचे मुख्य कारण म्हणजे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील वाशी व लाढंर या गावातील व्यक्ती काम करित होते. त्यातील एक जागा रिक्त झाली आहे. त्यामुळे हि रिक्त जागा म्हणजे पुढील संधी हि करिवणे गावातील भरावी अशी आमची माफक अपेक्षा आहे.

ग्रुप ग्रामपंचायतच्या बॉडीने जर त्यांच्या हातामध्ये असलेली ही जागा आमच्या गावातील व्यक्ती भरली तर एका कुटुंबाला रोजगार मिळेल त्यामुळे एका तरुणीला किंवा या जागे करता पात्र ठरवावे, अशी ग्रामपंचायतीला विनंती आहे, असे कोकरे यांनी सांगितले.

## माणगावमध्येही चांद्रयान मोहिमेचा जल्लोष

**माणगाव : प्रतिनिधी**

चांद्रयान ३ यशस्वी करून भारताने बुधवारी चंद्रावर पाऊल ठेवून इतिहास घडविल्याने याचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी माणगावमधील तरुणांनी एकत्रित येत जल्लोष केला.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अथक परिश्रम आणि संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांचे हे यश आहे. इस्रोच्या वैज्ञानिकांनी इतिहास घडविला. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहचणारा भारत हा जगातील पहिला देश आहे. याचा आनंदोत्सव बुधवार दि. २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी माणगावमधील तरुणांनी बसस्थानक माणगावसमोर मुंबई-गोवा महामार्गावर एकत्रित येत फटाक्यांच्या आतषबाजीत हातात तिरंगा घेऊन भारत माता कि जय, वंदे मातरम असा नारा देऊन साजरा केला.

या वेळी युवा सेना शिंदे गटाचे दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख विपुल उभारे, माणगांव तालुका शेतकरी खरेदी-विक्री संघाचे सभापती तथा भाजपचे युवा नेते निलेश थोरे, शिंदे गटाचे जिल्हा सचिव अच्युत तोंडलेकर, परेश सांगले, वैभव मोरे, स्वप्नील सकपाळ, राजू सुतार, नयन पोटले, श्रीराम कळंबे, ललित ओसवाल, मंदार मढवी आदी देशप्रेमी नागरिक उपस्थित होते.



## निवडक

### युवा महोत्सवात सांस्कृतिक स्पर्धा

**रोहे :** मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सव २०२३ मधील रायगड (दक्षिण विभाग)साठी उर्वरित सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन बुधवारी द. ग. तटकरे महाविद्यालय, तळा येथे करण्यात आले. रोहा तालुक्यातील धाटाव येथील एम.बी.मोरे महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी कथालेखन आणि प्रश्नमंजूषा या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. महिला महाविद्यालयाच्या सात विद्यार्थिनी आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सुरभी ठाकूर या स्पर्धांमध्ये सहभागी झाल्या होत्या.





**पेण : तालुक्यातील खारपाडा (ठाकूरपाडा) येथील शंकर गणेश ठाकूर यांनी सामाजिक भान राखत त्यांची कन्या अद्विका हिच्या वाढदिवसानिमित्त पत्नी स्वप्निता ठाकूर, भाचा मिलन पाटील यांच्यासह बांधनवाडी येथे ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या बालग्राम प्रकल्पातील बालकांना धान्य, किराणा, शैक्षणिक साहित्य वाटप केले.**

### राष्ट्रवादीच्या नियुक्त्या जाहीर



**माणगाव :** तालुक्यातील महिला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या जिल्हाध्यक्षा उमा मुंढे यांनी आपल्या सहीनिशी काढलेल्या नियुक्तीपत्रात तालुकाध्यक्षपदी संगीता संजय बक्कम यांची तर शहराध्यक्षपदी योगिता गणेश चव्हाण या यांची फेरनिवड करण्यात आली. त्यांना तशा आशयाचे नियुक्तीपत्र खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते व जिल्हाध्यक्षा उमा मुंढे यांच्या उपस्थितीत देण्यात आले.संघटक मनाली मनोज पवार, विशाखा विलास यादव, जिल्हा उपाध्यक्ष देविका पाबेकर, गुलनार नगदाडे, जिल्हा निमंत्रित सदस्य राधिका कृष्णा तटकरे, सोशल मीडिया जिल्हा प्रमुख किशोरी हिरवे यांनाही नियुक्तीपत्र देण्यात आले.

### संतोष घरटकर यांचे अभिनंदन



**पोलादपूर :** रायगड जिल्हा संघर्ष पत्रकार असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष व दैनिक रत्नागिरी टाइम्स रायगड आवृत्तीचे महाड कार्यालयीन प्रमुख पत्रकार संतोष घरटकर यांना ग्रीन वर्ल्ड प्राइड ऑफ इंडिया हा अत्यंत मानाचा पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल घरटकर यांचे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे रायगड जिल्हा अध्यक्ष शैलेश पालकर, जिल्हा सदस्य विश्वास नलावडे आणि पोलादपूर शाखेचे खजिनदार योगेश भोसले यांनी अभिनंदन केले.



**माणगाव : येथील कृषी अधिकारी प्रमोद देशमुख यांना वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ पत्रकार सलीम शेख, मजिद हाजिते, कमलाकर होवाळ, आजेश नाडकर आदींनी शुभेच्छा दिल्या.**


### महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां.विभाग, पनवेल
पिनकोड - ४१० २०६
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स — ०२२-२७४६७४४०
ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ७८ (ई-निविदा) सन २०२३-२४

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दूरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविण्येत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www. mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण ०१ काम समाविष्ठ असून ऑनलाईन निविदा विक्री व बोड प्रिपरेशन दिनांक २५.०८.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक ११.०९.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल

ई-निविदाजा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :- २५/८/२०२३



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे चिखले, ता. पनवेल, जि. रायगड येथील नामदेव कान्हा पाटील (समस्त इनामदार वहीवाटदार दत्तात्रेय दामोदर पाटणकर व बावीस) यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे - चिखले, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे / गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|
| २६ | २ | ० - ०९- ०० | १.८७ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज,अॅटचमेंट, लीज एम. ओ.यु.वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तकार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तकार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी / नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**अॅड. विजय रामराव सुरडकर,**
**ठि.: पनवेल** **पत्ता :**४०३,श्री. आराधना कॉ.ऑप. होऊ. सोसा.,से-५,प्लॉट नं .३६, सानपाडा ,नवी . मुंबई :४००७०५, **फो :9870099284**
**दि. 25/08/2023**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - चेरवली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|
| ३/४ | ०-२३-००<br>पो.ख. ०-१९-७०<br>**एकूण ०-४२-७०**<br>**पैकी ०-२२-००** | ३.८३ | श्री. बाळाराम रामा भालेकर |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २४/०८/२०२३.

**सही/-**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१



### शुद्धीपत्रक

सदर कामाची ई-निविदा दिनांक १० ऑगस्ट २०२३ च्या अंकात पान नं. ५ वर प्रसिद्ध झाली होती. सदर जाहिरात सा. बां. विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करताना झालेल्या तांत्रिक अडचणीमुळे विषयांकीत निविदेचा कालावधी वाढविणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर निविदा सूचनेतील निविदा सादर करण्याचा, निविदा पूर्व बैठकीचा व निविदा उघडण्याचा कालावधी यामध्ये या शुद्धीपत्रकान्वये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. याची संबंधीत निविदाकारांनी नोंद घ्यावी व त्यानुसार ऑनलाईन निविदा सादर कराव्यात, ही विनंती

**ई निविदेचे सुधारीत वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२३/०८/२०२३** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **०६/०९/२०२३** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदा पुर्व बैठक | मा.अधीक्षक अभियंता, रायगड ( सा.बां) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **२९/०८/२०२३ वेळ १५.००** वाजता |
| ३ | ऑनलाईनव्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | मा.अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **०८/०९/२०२३** वेळ ११.०० वाजता |

आपला विश्वासू
----- **सही** -----
**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण**
**रायगड**



### प्लॉट फॉर सेल

पनवेल महानगरपालिका हद्दीत, मुंबई-पुणे हायवे फ्रंटेज असलेला अत्यंत मोक्याचे ठिकाणी असलेला सुमारे ११०० चौ.मीटरचा क्लीयर टायटल खुद्द मालकीचा (सिडको लीज नव्हे) प्लॉट विकणे आहे.

पळस्पेफाटा जंक्शन-पनवेल रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टँड - २ किमी., नवी मुंबई विमानतळ ४ किमी., मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवे ३ किमी.
एजंट नको, किंमत १५ कोटी

प्लॉट संबंधी लोकेशन प्लॅन, ७/१२ उतारा, नकाशाचे झेरॉक्स प्रतीचा सेट रुपये एक हजार रोखीने दिल्यास मिळेल.

**पेपर्स आणि साईट व्हीजीटसाठी कॉन्टॅक्ट**
**१) श्री. घाटे ९९६७५५२९१५**
**२) श्री. भगत ९३२२५०६५१७**

# नवी मुंबईत फेरीवाल्यांचा उच्छाद

## सानपाडा रेल्वेस्थानक ते एपीएमसी मार्गावर ठिय्या

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा रेल्वेस्थानक ते एपीएमसी मार्गावर मागील काही महिन्यांपासून फेरीवाल्यांनी उच्छाद मांडला आहे. येथील फेरीवाल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली असल्याने महापालिकेने हा मार्ग फेरीवाल्यांना आंदणच दिला आहे की काय अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे.

आशिया खंडातील सर्वांत मोठी बाजारपेठ आलेल्या तुर्भे येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळ, भाजी, मसाला, धान्य या मार्केटच्या परिसराला फेरीवाल्यांचा विळखा पडला आहे. एपीएमसी प्रशासन आणि महापालिका यांच्याकडून या फेरीवाल्यांना अभय मिळत असल्याने या फेरीवाल्यांची मुजोरी इतकी वाढली आहे की ते आता फुटपाथ बरोबरच थेट रस्त्यावरदेखील बसू लागले आहेत. त्यामुळे सकाळी एपीएमसी फळ मार्केट ते भाजी मार्केट या मार्गावरील पदपथ पादचाऱ्यांना चालण्यासाठी उपलब्ध नसतो. तसेच सिटी मॉल ते एपीएमसी सिग्नलच्या सर्व्हिस रोडवर २० कांदे बटाटे विक्रेते, १० न्हावी (केस कापणारे) यांनी पदपथ बळकावला आहे. विशेष म्हणजे या ठिकाणच्या फेरीवाल्यांवर कारवाई करून हा पदपथ नागरीकांना ये जा करण्यासाठी उपलब्ध करून दिला जात नव्हता. याची नोंद मानव अधिकार आयोगाने घेऊन सुमोटो याचिका दाखल करून घेतली होती. त्या वेळी तुर्भे विभाग कार्यालयातील अधिकाऱ्यांनी कारवाई करून त्याचे फोटो आयोगाला सादर केले होते. त्यानंतर पुन्हा कांदे बटाटे विक्रेते आणि न्हावी यांनी महापालिकेच्या कारवाईला ठेंगा दाखवत फुटपाथवरती बांबू रोवून पावसाळी शेड उभारले आहे.

या ठिकाणी प्रत्येक विक्रेत्याकडे वीस ते पंचवीस गोणी कांदा तसेच बटाटा साठवून ठेवलेला असतो. विशेष म्हणजे रात्रीच्या वेळी कोणी हा माल चोरून नेऊ नये यासाठी सुमारे १५ हजार रुपये सुरक्षारक्षकावर खर्च करून या मालाची रखवाली केली जाते. यावरूनच येथे होत असलेला आर्थिक व्यवहाराची उलाढाल किती असेल याचा अंदाज बांधला जाऊ शकतो, अशी माहिती सूत्रांनी दिली.







### अनेकदा किरकोळ, गंभीर अपघात

**एपीएमसी मार्केटमध्ये येणारे कामगार, खरेदीदार आदी पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून रस्त्यावरून चालावे लागत आहे. परिणामी अनेकदा किरकोळ आणि गंभीर स्वरूपाचे अपघात होत असल्याची नोंद वाहतूक पोलीस शाखेकडे आहे. महापालिका तक्रार आली की कारवाई करते. त्यानंतर फेरीवाले पुन्हा पदपथ आणि रस्ते बाळकावून या कारवाईला हप्त्याच्या जोरावर भीक घालत नसल्याचे कृतीतून दाखवून देत आहेत.**

### पदपथावर बस्तान

भाजी मार्केटच्या विरुद्ध बाजूकडील रस्ता ते माथाडी भवन चौक पर्यंत १५ ते २० कांदे बटाटे विक्रेत्यांची टेम्पो लागलेले असतात. यावरही महापालिका आणि एपीएमसी वाहतूक पोलीस, एपीएमसी पोलीस ठाणे यांच्याकडून दुर्लक्ष केले जाते. एपीएमसी सिग्नल ते भाजीपाला मार्केट जावक गेट, याच जावक गेटच्या विरुद्ध बाजूचा सर्व्हिस रोड, माथाडी भवन ते जलाराम मार्केट चौक, सानपाडा हायवे सिग्नल ते एपीएमसी सिग्नल या ठिकाणी फेरीवाल्यांनी पदपथावर बस्तान मांडले आहे.

# जपानमधील अभ्यास गटाची नवी मुंबईतील प्रकल्पांना भेट

**नवी मुंबई : बातमीदार**



अधुनिक शहराप्रमाणेच पर्यावरणशील इको सिटी ही देखील नवी मुंबईची वेगळी ओळख असून नवी मुंबईतील पर्यावरणपूरक प्रकल्पांची पाहणी करण्यासाठी जपान देशातील ओसाका सिटी गव्हर्मेंटच्या अधिकाऱ्यांनी नवी मुंबई महापालिका मुख्यालयास भेट दिली तसेच तुर्भे येथील ई व्हेईकल चार्जींग स्टेशनच्या कार्यप्रणालीची पाहणी केली.

या वेळी शहर अभियंता संजय देसाई यांनी ओसाका सिटी गव्हर्मेंट जपानचे अधिकारी ओकामोटो, कटाओका, ग्लोबल इन्व्हायरोमेंट सेंटर जपानच्या अधिकारी अकीको डोई, नावो नाकाजिमा आणि ओसाका सिटी जपानचे भारत देशातील प्रतिनिधी अंशुमन नेल बासू, दुभाषक डिम्पल यांचे नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्वागत केले. पर्यावरणाच्या अनुषंगाने अत्याधुनिक कार्याप्रणाली व प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने जपान मधील ओसाका सिटी गव्हर्मेंट आणि महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला असून पर्यावरण, किनारपट्टी व बंदर विकास तसेच स्मार्ट सिटी विषयाच्या अनुषंगाने ओसाका सिटी गव्हर्मेटचे अभ्यासगट विविध भागांना भेटी देत पाहणी करत आहेत व माहिती जाणून घेत आहेत.

या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या वतीने नवी मुंबई महानपालिकेचे ई व्हेईकल चार्जींग स्टेशन तसेच तळोजा एमआयडीसीतील फिश प्रोसेसिंग व फुड प्रोसेसिंग युनिटला भेट देण्याच्या पाहणी दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी नवी मुंबई महापालिकेचे शहर अभियंता संजय देसाई, परिवहन व्यवस्थापक योगेश कडुस्कर, अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी सतिश पडवळ आणि सह प्रादेशिक अधिकारी जयंत कदम, सचिन आरकड, विक्रांत भालेराव उपस्थित होते.

नवी मुंबई शहरातील स्वच्छता आणि सुशोभिकरणाने प्रभावित झाले असल्याचे अभिप्राय जपान मधील ओसाका सिटी गव्हर्मेंटच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

# चांद्रयान-३च्या यशाचा कोपरखैरणेत आनंदोत्सव



**नवी मुंबई : बातमीदार**

भारताच्या चांद्रयान ३ च्या अभूतपूर्व यशाचा आनंद उत्सव कोपरखैरणे येथे आज साजरा करण्यात आला. माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक आणि नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या नेतृत्वाखाली चांद्रयान ३ विक्रम लॅन्डरच्या सॉफ्ट लँडिंगचे थेट प्रक्षेपण कोपरखैरणे येथे आयोजित करण्यात आले होते.

या ऐतिहासिक मोहिमेच्या यशाचे साक्षीदार होण्यासाठी नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक यांच्यासह लोकप्रतिनिधी, नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चांद्रयान ३ची हुबेहूब प्रतिकृतीदेखील या ठिकाणी साकारण्यात आली होती. विक्रम लँडरचे सॉफ्ट लँडिंग होताच उपस्थितांनी एकच जल्लोष केला. तिरंगा फडकविण्यात आला. मान्यवरांनी उपस्थितांना मिठाई वाटून भारताच्या यशाचा आनंद गोड केला.

डॉक्टर संजीव नाईक यांनी चांद्रयान तीनच्या यशासाठी इस्रोच्या सर्व शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले. महान शास्त्रज्ञ विक्रम साराभाई यांच्या नावे तयार केलेल्या विक्रम लॅन्डरने चंद्राच्या भूपृष्ठावर सॉफ्ट लँडिंग केले. इस्रोचे प्रमुख एस. मोहन कुमार आणि त्यांच्या वैज्ञानिकांच्या संपूर्ण टीमने ऐतिहासिक अशी कामगिरी केलेली आहे. ही कामगिरी भविष्यात जगासाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

चांद्रयान ३चे यश केवळ भारतासाठीच नाही तर जगासाठी ऐतिहासिक आहे, अशी प्रतिक्रिया नवी मुंबई जिल्हा भाजपा अध्यक्ष संदीप नाईक यांनी दिली आहे. या भूतपूर्व यशासाठी त्यांनी इस्रोच्या सर्व वैज्ञानिकांचे मनः पूर्वक अभिनंदन केले आहे.

# गव्हाण विद्यालयात विविध संघांची स्थापना

## चेअरमन अरुणशेठ भगत यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत जुनिअर कॉलेजमध्ये इयत्ता पाचवी ते बारावी अखेर शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता शिक्षक पालक संघ, माता पालक संघ व गुरुकुल शिक्षक पालक संघ या तिन्ही संघांच्या कार्यकारिणीची स्थापना करण्यात आली. या वेळी शिक्षक पालक संघ व माता पालक संघांच्या कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सहविचार सभेमध्ये शिक्षक पालक संघ व माता पालक संघांच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या वेळी स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतच्या सदस्या कामिनी कोळी, पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेवशेठ ठाकूर, विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, जुनिअर कॉलेज शिक्षक, माध्यमिक विभागाचे शिक्षक, विद्यार्थी आणि पालक संघाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

शिक्षक पालक संघ व माता पालक संघाच्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे माननीय चेअरमन व इतर मान्यवरांच्या शुभहस्ते यावेळी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. सर्व सदस्य पालकांचे प्रतिनिधी म्हणून कुंदन मोकल व निता पाटील यांचाही या वेळी सन्मान करण्यात आला. आपल्या मौलिक सूचना माननीय पदाधिकाऱ्यांनी पालक संघाच्या सभेत मांडव्यात, असे आवाहन माननीय चेअरमन अरुणशेठ भगत यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे यांनी केले. सूत्रसंचालन सागरकुमार रंधवे यांनी केले.

**शिक्षक पालक संघ कार्यकारिणी**

अध्यक्ष (पदसिद्ध) प्रमोद मंडले, प्रभारी प्राचार्य उपाध्यक्ष (फेरनिवड) नामदेव शंकर ठाकूर, सहसचिव दिलीप जनार्दन भगत, सचिव देवेंद्र म्हात्रे (शिक्षक प्रतिनिधी) सहसचिव वेदांती गिरीश पाटील (विद्यार्थी प्रतिनिधी)

**माता पालक संघ कार्यकारिणी**

अध्यक्ष (पदसिद्ध) प्रमोद मंडले, प्रभारी प्राचार्य उपाध्यक्ष प्रिती हरेश कोळी, सहसचिव कामिनी प्रमोद कोळी (ग्रामपंचायत सदस्या, गव्हाण) सचिव जे. एच. माळी (शिक्षिका प्रतिनिधी) सहसचिव दीक्षा रमेश वर्तक (विद्यार्थिनी प्रतिनिधी)

# अण्णाभाऊ साठे यांचे विचार युवावर्गापर्यंत पोहचवा

## भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे मानवतावादी क्रांतिकारी विचार युवावर्गापर्यंत पोहचविण्याचे आवाहन नवी मुंबई जिल्हा भाजप अध्यक्ष संदीप नाईक यांनी केले आहे.

महाराष्ट्र-आंध्र-कर्नाटक मातंग समाज महासंघ आणि उमाकांत नामवाड चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या १०३व्या जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी आपले विचार मांडले.



अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी अभिवादन केले. आमदार गणेश नाईक आणि मातंग समाजाचे आजवर घनिष्ठ ऋणानुबंध राहिले आहेत. मातंग समाजामधील नेतृत्वाचा नाईक यांनी नेहमीच सन्मान केला आहे. यापुढेदेखील या समाजातून उच्चशिक्षित पिढी तयार व्हावी याकरिता तसेच समाजातील लोकांच्या संपन्नतेसाठी कार्यरत राहण्याची ग्वाही जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी या वेळी दिली. या कार्यक्रमास उमाकांत नामवाड चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष संदीप नामवाड, माजी नगरसेवक चंद्रकांत पाटील, फकीरा पँथरचे संस्थापक अध्यक्ष वकील गुरु सूर्यवंशी तसेच मातंग महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## निवडक

### नेरूळमध्ये स्लॅब कोसळून दोघे ठार



**नवी मुंबई :** नेरूळ सेक्टर सहा येथे बुधवारी रात्री आठ वाजता चार मजली इमारतीतील एका विंगचे स्लॅब कोसळून एक महिला व एक पुरुष ठार झाले. तर चार जण जखमी झाले. जखमींवर डॉ. डी वाय पाटील रूग्णालयात उपचार सुरू आहे. नेरूळ येथे सेक्टर सहा तुलसी भवन इमारत आहे. या इमारतीत तिसऱ्या मजल्यावर लादी लावण्याचे काम सुरू होते. अचानक तिसऱ्या मजल्याचा स्लॅब कोसळल्याने खालील दोन स्लॅबदेखील कोसळले. यात एका महिलेचा मृत्यू झाला. तर इतर चार जण जखमी झाले. यात महिला रहिवाशी असून पुरुष कामगार असल्याची माहिती मिळत आहे. ही घटना कळताच आयुक्त राजेश नार्वेकर, मुख्य अभियंता संजय देसाई यांनी धाव घेतली. अग्निशमन दलाने तातडीने डेब्रिज हटवण्यात सुरुवात करत जखमींना रूग्णालयात दाखल केले.

### द्रोणागिरी विद्यालयात नागपंचमी साजरी



**उरण :** श्रावण महिन्यातील पहिला सोमवार आणि श्रावण शुद्धपंचमी म्हणजेच श्रावण महिन्यातील पहिला सण नागपंचमी हा सण द्रोणागिरी विद्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथम विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. प्रभू यांनी नागाच्या प्रतिमेचे पूजन केले आणि त्यानंतर विद्यालयातील सर्व शिक्षकांनी नागाच्या प्रतिमेचे पूजन करून नागदेवतेस नैवद्य अर्पण केला. नागदेवतेची पूजा ही प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. हे विद्यार्थ्यांना माहित व्हावे म्हणून विद्यालयातील छोटा शिशू वर्गा पासून ते इयत्ता दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी नागाच्या प्रतिमेचे पूजन केले.

### शिवसेना शाखेचे उद्‌घाटन



**नवी मुंबई :** सानपाडा सेक्टर ५ येथील दत्त विद्या मंदिर समोरील शिवसेना विभाग प्रमुख भावेश पाटील यांच्या नूतन शिवसेना शाखेचे उद्‌घाटन उपनेते विजय नाहटा यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या वेळी शहर संघटक सुरेखा गव्हाणे, संपर्क प्रमुख दमयंती आचरे, नवी मुंबई उपजिल्हा प्रमुख गणपत शेलार, जिल्हा संघटक सरोज पाटील, शिक्षण समिती सदस्य अजित सावंत, माजी नगरसेवक रामाशेठ वाघमारे, उपविभाग प्रमुख देवेंद्र चोरगे, नवी मुंबई उत्तर भारतीय सेल प्रमुख कमलेश वर्मा, शाखा प्रमुख मनोज भोईर आदी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यवाटप



**नवी मुंबई, खारघर :** राहुल शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने संस्थेच्या दिवंगत अध्यक्षा शांताबाई रामराव हाडोळतीकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून नवी मुंबई परिसरातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल आणि प्राविण्य प्राप्त शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य शिक्षणतज्ञ प्राचार्या कुसुमताई चौधरी यांच्या हस्ते सत्याग्रह कॉलेजच्या सभागृहात वाटप करण्यात आले. राहुल शिक्षण प्रसारक मंडळाच्या सिध्दार्थ, अजिंठा, डॉ. जी. के. डोंगरगावकर, डॉ. नेल्सन मंडेला शाळेतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना छत्रीवाटप प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाचे संचलन प्राचार्या नेहा राणे यांनी तर प्रा. संगीता जोगदंड यांनी आभार मानले.

### 'अपोलो'मध्ये अवयवांचे प्रत्यारोपण

**पनवेल :** नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्सने ५३३ सॉलिड अवयव प्रत्यारोपण पूर्ण करून एक इतिहास घडवला आहे. नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्स येथील अपोलो इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सप्लांटमधील सर्वांत मोठ्या आणि सर्वसमावेशक अशा अत्याधुनिक बहु-अवयव प्रत्यारोपण कार्यक्रमामुळे हे यश प्राप्त झाले असून २०१७ पासून या हॉस्पिटल्सने ३२७ मूत्रपिंड प्रत्यारोपण, १९८ यकृत प्रत्यारोपण आणि ८ हृदय प्रत्यारोपण केले आहेत. अपोलो हॉस्पिटल्सच्या पश्चिमी क्षेत्राचे यकृत आणि एचपीबी प्रोग्रामचे मुख्य सल्लागार डॉ. प्रा. डॅरियस मिर्झा, यूरोलॉजी, यूरो-ऑन्कोलॉजी, मूत्रपिंड प्रत्यारोपण आणि रोबोटिक शस्त्रक्रियेचे वरिष्ठ सल्लागार डॉ. अमोल कुमार पाटील, हॉस्पिटल्सचे सीव्हीटीएस, हृदय आणि फुफ्फुस प्रत्यारोपण शस्त्रक्रियेचे सल्लागार डॉ. संजीव जाधव, पश्चिमी विभागाचे प्रादेशिक सीईओ संतोष मराठे यांनी या यशाबद्दल अभिमान आणि समाधान व्यक्त केले आहे.




### श्रावणधारा

श्रावणधारा या श्रावणधारा
करिती मज या सजल इशारा !!धृ.!!

मंद डोलती ही गवत पाती
संथ उडतो हा गगनपक्षी
गातो गाणी हा मंजुळ वारा...
आनंद देती या जलधारा !!१!!

सप्त रंगांची ही किमया पाहुनी
तृप्त होती मनं जाती मोहुनी
इंद्रधनुचा हा रम्य पसारा...
धुंद करितो हा जग सारा !!२!!

हिरवा शालू हा अंगावरी
भुरळ पाडते ही दिनमणी
नटली थटली ही वसुंधरा...
दिसते जणू ही नवदारा !!३!!

सृष्टीची अनोखी रूपे पाहुनी
प्रेमिकांची प्रीती येते फुलोनि
अवर्णनीय हा रम्य नखरा...
दिसे सृष्टीचा हा साज प्यारा !!४!!



-सुनील म्हसकर,
कल्याण

## निवडक



### उसरोली येथे नेत्र तपासणी शिबिर

**मुरुड :** लायन्स हेल्थ फॉउंडेशन अलिबाग व अंशू फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर उसरोली येथे झाले. सुमारे ८२ रुग्णांची तपासणी या शिबिरामधून करण्यात आली. त्यापैकी ३२ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी वरिष्ठ हॉस्पिटल येथे पाठवण्यात येणार आहे. शिबिरासाठी डॉ. शुभदा कुडतुरकर, डॉ. हर्षदा गोरे, राहुल घरत, सुजित पाटील, सुमित जाधव, कमलाकर पाटील, कमलेश रावत आदींनी उत्कृष्ठ काम केले. आतापर्यंत या संस्थेतर्फे विविध ग्रामीण भागात चार कॅम्प करून सुमारे २०० रुग्णांचे मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून लोकांना दृष्टी देण्याचे महत्त्वपूर्ण काम बजावले आहे.

### जखमी घुबडाची पक्षीमित्राकडून सुटका

**खोपोली** : जखमी अवस्थेतील बार्न प्रजातीचा घुबडाची



खोपोलीतील पक्षी-प्राणीमित्र नवीन मोरे, सुनील पुरी आणि चेतन चौधरी यांनी सुखरूप सुटका केली आहे. बुधवारी शहरातील लौजी भागात डॉ. गुप्ता यांच्या घराच्या परिसरात घुबड आढळले. शहरातील पक्षी प्राणीमित्र यांना माहिती मिळतात त्यांनी घुबडाची सुरक्षित सुटका केली आहे. त्याला अधिक उपचाराची गरज असल्याने सध्या सुनील पुरी हे त्याची देखभाल करणार आहेत.

### हाशिवरे येथे मंगळागौर नृत्य स्पर्धा

**अलिबाग** : श्रावण महिन्याचे औचित्य साधून महिला आघाडी राष्ट्रवादी कॉंग्रेस अलिबाग तालुका यांच्या वतीने ३ सप्टेंबर रोजी महिलांसाठी श्रावणसरी मंगळागौर नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धा अलिबाग तालुक्यासाठी मर्यादित असून हाशिवरे येथे घेण्यात येणार आहेत. महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे आणि महिला रायगड जिल्हाध्यक्ष उमा मुंडे यांची विशेष उपस्थिती असणार आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी ३१ ऑगस्ट ही अंतिम तारीख आहे. तालुकाध्यक्ष आरती मोकल (८९९३४०३६६५), जिल्हा सरचिटणीस मानसी चेउलकर (९३७०५१६२६१), मीनाक्षी खरसंबळे (९५२७७८९२६६७) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खालापुरातील हाळ उर्दू शाळेची दुरवस्था

## विद्यार्थ्यांसह पालकांचा जीव टांगणीला; शाळा पुनर्बांधणीची मागणी

**खालापूर, मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्याच्या हाळ गावातील उर्दू शाळा कोसळण्याच्या स्थितीत असून भितीखाली विद्यार्थी भविष्याचे धडे गिरवत आहेत. त्यामुळे विद्यार्थी व पालक चिंतेत आहेत.

हाळ खुर्द ग्रामपंचायतीच्या हद्दीत १२ गुंठ्यांमध्ये असलेली जि.प.ची उर्दू शाळा सध्या दुरवस्थेत आहे. ही शाळा १९०५ साली बांधण्यात आली आहे. आता ती जोत्यापासून कमकुवत झाली आहे. छप्पर, भिंती, खिडकी खराब झाल्याने भविष्यात कधीही अपघात घडू शकतो, अशी स्थिती आहे

२०२०पासून वेगवेगळ्या माध्यमातून प्रशासनाकडे या शाळेच्या पुनर्बांधणीसाठी सातत्याने मागणी केली आहे, मात्र शाळेसाठी निधी मिळत नसल्याने मुस्लीम बांधव नाराजी व्यक्त करीत आहेत. शाळेची अवस्था पाहत जनसहभाग व उद्योजक नौफिल सय्यद यांच्या आर्थिक मदतीने शाळेची तात्पुरती दुरुस्ती



करण्यात आली होती.

याबाबत खालापूर गटशिक्षणाधिकारी विभागाकडे माहिती घेतली असता दुरुस्तीसाठी १५ लाख रुपये निधी देणार असल्याचे समजते, पण पायाच मजबूत राहिला नसल्याने या शाळेची पुनर्बांधणीच करण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

या शाळेत कुठल्याही प्रकारची सोयीसुविधा नसल्याने विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होत आहे. उर्दू भाषेबद्दल असलेले महत्त्व, साहित्यिक योगदान याबाबत असंवेदनशीलता दाखवणारी मंडळी याबाबत गंभीरपणे विचार करीत नाही.

शैक्षणिक दर्जा उंचावा व सोयीसुविधा उपलब्ध असलेली शाळा अस्तित्वात यावी, असा कुठल्याही प्रकारचा नियोजन करीत नसल्याने ग्रामस्थांनी याबाबत लोकशाहीच्या माध्यमातून आंदोलने करण्याचा इशारा दिला आहे.

**शालेय नवीन इमारत, सुरक्षा भिंत, पाण्याची टाकी, आधुनिक प्रयोगशाळा, शौचालय, संगणक कक्ष, कर्मचारी भरती, पहिली ते दहावीपर्यंत आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून वर्गखोल्या नवीन पुनर्बांधणीसाठी आवश्यक आहे. याबाबत शासनाने त्वरित दखल घ्यावी.**

**-साबीर शेख,**
**भाजप प्रदेश अल्पसंख्याक नेते**

# एक्स्प्रेस गाड्यांना माणगावात थांबा द्या

## केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवेंचे आमदार गोगावलेंनी वेधले लक्ष

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण रेल्वे मार्गावर एक्सप्रेस गाड्यांना माणगाव व महाड तालुक्यातील वीर रेल्वेस्थानकात थांबा द्यावा, तसेच पनवेल ते वीर लोकलसेवा सुरू करावी, गोरेगांव रेल्वेस्थानकाच्या प्लॅटफॉर्मची उंची वाढवावी, अशा प्रवाशांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांकडे आमदार भरत गोगावले यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे लेखी निवेदनाद्वारे लक्ष वेधले आहे.

दक्षिण रायगडातील माणगाव, महाड व पोलादपूर असे तीन तालुके तसेच लगतचे म्हसळा, तळा, श्रीवर्धन असे तीन तालुके असे एकूण सहा तालुक्यातील नागरिकांना, प्रवाशांना मध्यवर्ती असे कोकण रेल्वेमार्गावरील माणगाव व वीर ही दोन रेल्वेस्थानके आहेत. दक्षिण रायगड जिल्ह्यातील नागरिक या रेल्वेस्थानकांचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. कोकण रेल्वेमार्गावर धावणाऱ्या अनेक गाड्यांचा थांबा या स्थानकांवर नसल्यामुळे गेली अनेक वर्षे प्रवाशांची गैरसोय होत आहे.




माणगाव तालुक्यात लोणेरे येथे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठ लोणेरे हे राज्यातील प्रमुख शैक्षणिक केंद्र आहे. महाड व विळे-भागाड एमआयडीसी, दीघी पोर्ट, प्रस्तावित दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर प्रकल्प अशा औद्योगिक विकासामुळे दक्षिण रायगड हे मुंबईलगतचे प्रमुख औद्योगिक केंद्र म्हणून उदयास येत आहे.

मुंबई-ठाणे या जिल्ह्यातून दक्षिण रायगड जिल्ह्यातील माणगाव, महाड, पोलादपूर, तळा, म्हसळा, श्रीवर्धन या ठिकाणी दैनंदिन प्रवास करणाऱ्यांची संख्या हजारोंनी वाढलेली आहे.

पनवेल-माणगाव वीर ही लोकल मेमू विशेष गाडी कायमस्वरूपी सुरू करण्यात यावी आणि पुढेही कायम ठेवून सामान्य प्रवाशांना दिलासा देण्यात यावा. त्याचबरोबर वरील मागणीनुसार कोकणकन्या, शताब्दी, नेत्रावती, मंगला या एक्सप्रेस गाड्यांना माणगाव व वीर या रेल्वे स्थानकांवर थांबे मिळावे, अशी मागणी या निवेदनातून केली आहे.

**सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा युवासेनेच्या वतीने नुकतीच दक्षिण रायगड कोकण रेल्वेप्रवासी संघटनेची स्थापना करण्यात आली. प्रवाशांना भेडसावणारे प्रश्न सोडविण्यासाठी या संघटनेची स्थापना करण्यात आली.**
**-विपुल उभारे, युवासेना जिल्हाप्रमुख**

# खालापुरात वर्दळीच्या ठिकाणी विद्युत खांब धोकादायक

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील मोक्याचे ठिकाणी असलेल्या विद्युत खांब वाकल्यामुळे दुर्घटनेची वाट न पाहता महावितरणाने तातडीने खांब बदलावा अशी मागणी होत आहे.

खालापूर शहरातील बस स्थानक, तहसील कार्यालय, पोलीस ठाणे परिसर आणि मुख्य वर्दळीचा रस्ता लगत महावितरणाचा विद्युत खांब आहे. खांब पायापासून पूर्णपणे वाकला आहे. या खांबावरून विद्युत तारांचे जाळे आहे. या परिसरात सातत्याने वर्दळ सुरू असते. त्यामुळे त्यामुळे खांब कोलमडून पडल्यास जीवितहानीची शक्यता आहे. महावितरण विभागाने धोकादायक खांब बदलण्यास देखील तत्परता दाखवावी अशी मागणी नागरिक करीत आहेत.



**पावसाळ्यात वादळ वाराची शक्यता असते. अनेकदा विद्युत तारांच्या संपर्कात आल्याने जनावरे तसेच मनुष्यहानी घडली आहे. त्यामुळे तत्काळ महावितरण अधिकारी यांनी लक्ष द्यावे.**
**-निशा दवणे, नागरिक**

महावितरण अभियंता यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु दूरध्वनीवरून संपर्क झाला नाही.

# मुरूड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसची कार्यकारिणी जाहीर

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष फैरोज घलटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत बुधवारी (दि. २३) तालुका राष्ट्रवादी काँग्रेसची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या वेळी शहर अध्यक्षपदासाठी खासदार सुनील तटकरे यांच्या शिफारशीने संजय गुंजाळ यांची निवड जाहीर करण्यात आली.

संजय गुंजाळ हे नगर परिषदेवर तीन वेळा निवडून आलेले आहेत. तर दोन वेळा ते स्वीकृत नगरसेवक म्हणून आपली प्रभावी जबाबदारी सांभाळली आहे, तसेच ते मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघावर नियंत्रण मंडळ अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. कोकण मराठी साहित्य परिषदेचे ते तालुकाध्यक्षही आहेत.

राजपुरी गणामधून श्याम कोतवाल उपाध्यक्ष तर वळके गणामधून दिनेश बाफलेकर यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. तालुका चिटणीस पदासाठी विजय पैर यांची दुसऱ्यांदा निवड करण्यात आली. महिला कार्यध्यक्ष



म्हणून माजी सभापती स्मिता खेडेकर, तालुका युवक अध्यक्ष म्हणून किरण नाईक म्हणून निवडण्यात आले आहे. राजपुरी गटासाठी आदेश भोईर, नांदगाव गटासाठी योगेंद्र गोयजी, उसरोली गटासाठी राज जानपाटील, वळके गटासाठी मंगेश शेट्टी यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

अध्यक्ष फैरोज घलटे यांनी सांगितले की, संपूर्ण तालुका हा खासदार सुनील तटकरे यांच्या पाठीशी उभा रहावा यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले पाहिजे. रायगड जिल्ह्याचा विकास हा तटकरे साहेबच करू शकतात यासाठी सर्वसामान्य माणसांनी त्यांची ताकद वृद्धिंगत करण्यासाठी त्यांच्या पाठीशी खम्बिरपणें उभे राहिले पाहिजे. सभेसाठी माजी सभापती स्मिता खेडेकर, माजी शहर अध्यक्ष हसमुख जैन, हिलाल महाडिक, लियाकत घलटे, इस्माईल सिद्धीकी, इकबाल चोगले, अनिस घलटे, अहमद लोगडे, गजानन वाघमारे, कृष्णा वाघमारे, नौशाद घलटे, बंटी करंबत व कार्यकर्ते उपस्थित होते.

## 'कृषी सुविधा निधीसाठी अर्ज करा'

**अलिबाग** : केंद्र शासनाच्या आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत कृषी पायाभूत सुविधा निधी योजना २०२०-२१ ते २०३२-२०३३ या कालावधीसाठी राबविण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांनी योजनेच्या www.agriinfra.dac.gov.in पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करावा. इतर आवश्यक माहितीसाठी नजिकच्या कृषी विभागाच्या कार्यालयास संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणेखेले यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत बँकांचा व्याज दर जास्तीत जास्त ९ टक्के किंवा त्यापेक्षा कमी असणार आहे. ३१ ऑगस्टपर्यंत कृषी पायाभूत विकास निधी योजनेच्या प्रचार प्रसिद्धी व लाभार्थी जोडणीसाठी हे अभियान राबविण्यात येत आहे.

# कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याबाबत महिलांना मार्गदर्शन

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुका विधी सेवा समिती खालापूर यांच्या माध्यमातून कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ अन्वये महिलांकरिता मार्गदर्शन शिबिर खालापूर शहरातील पहल नर्सिंग लाईव्ह येथे झाले.

या वेळी अधिकारी रामरामे मॅडम, खालापूर युवा वकिल संघटना अध्यक्ष ॲड. सचिन चाळके, खालापूर न्यायालयातील दिनेश राठोड, मिथुन गुंजाळ आदींसह पहल नर्सिंग लाईव्हच्या सर्व नर्स, स्टाफ व शिक्षिका उपस्थित होत्या. खालापूर युवा वकिल संघटना अध्यक्ष ॲड. सचिन चाळके यांनी उपस्थितांना स्त्रियांवर होणारे अत्याचार आणि त्यावर प्रतिबंधक कायदे यांची माहिती देत महिलांवर हिंसाचार झाल्यास तक्रार कोठे करायची, त्याची कायदेशीर प्रक्रिया याचे मार्गदर्शन केले. अर्ज पीडित स्त्री, राज्य सरकारद्वारे नियुक्ती केलेल्या संरक्षण अधिकाऱ्याकडे करू शकते.

पीडितेला संरक्षण आदेश आर्थिक मदत, मुलांचा ताबा, घरात राहण्याबाबत आदेश आणि नुकसान भरपाई आदेश या प्रकारच्या मदती मिळु शकतात आणि भारतीय दंड विधान कलम ४९८ अ नुसार अन्वये तकार दाखल करता येते व पीडितेला विनामुल्य कायदे विषयक मदत मिळते, अशा अनेक विषयावर मार्गदर्शन केल्याने महिलांनी समाधान व्यक्त केले.



# गोविंदा पथकांकडून दहीहंडी फोडण्याचा सराव

## अलिबागच्या वरसोलीत पुरुषांसह महिला पथकाचीही तयारी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

श्रावणातील गोकुळाष्टमीचा सण काही दिवसांवर येत असल्याने सर्वत्र गोविंदा पथकांचा दहीहंडी फोडण्याचा सराव जोशात असल्याचे चित्र आहे. अलिबाग तालुक्यात वरसोली येथील जय भवानी गोविंदा पथकामध्ये पुरूष गोविंदा पथकासह महिलाचा गोविंदा पथक जोशात सरावात मग्न आहे.

मुंबई, ठाणे व पुणे शहरातील उंच उंच दहिहंडी फोडण्याचे आकर्षण रायगड जिल्ह्यातही आहे. ठिकठिकाणी उंच उंच दहिहंडी नाक्यानाक्यावर पहावयास मिळते. या उंच दहिहंडी फोडण्यासाठी अनेक गोंविदा पथके परिश्रम घेतात. त्याचाच एक भाग म्हणून ज्याप्रमाणे शहरी भागात गोविंदा पथके गोविंदाच्या काही दिवस अगोदर सरावात सहभाग घेतात.

अलिबागमध्येही उंच उंच दहिहंडी गोविंदामध्ये पहावयास मिळतात. यामध्ये प्रशांत नाईक मित्रमंडळाची उंच दहिहंडी नावलौकिकास आहे. या उंच दहीहंडी फोडण्यासाठी अनेक गोविंदा पथके सामील होत असतात. वरसोली येथील जय भवानी गोविंदा पथकसुद्धा प्रतिवर्षी दहिहंडी फोडण्यासाठी प्रसिद्धीस आहे. वरसोलीच्या जय भवानी गोविंदा पथकाने सन २०१९ साली प्रशांत नाईक मित्रमंडळाची दहीहंडी फोडून रूपये एक लाख ११ हजार, १११ रूपये बक्षिस पटकाविले होते.

यावर्षीही वरसोलीत येथील जय भवानी गोंविदा पथकांची उंच दहिहंडी फोडण्यासाठी कंबर कसली असून गोविंदा पूर्वी एक महिना अगोदर उंच दहिहंडीसाठी थर लावण्याचा सराव सुरू केला आहे. यावर्षी जय भवानी गोविंदा पथकांनी सहा थर लावून प्रात्यक्षिक केले असून आगामी गोविंदामध्ये उंच दहिहंडी फोडण्यासाठी सज्ज आहे. वरसोली येथील जय भवानी गोविंदा पथकांत महिलांच्या गोविंदा पथकांनीसुद्धा जोरदार सराव सुरू केला आहे.

## आनंदीबाई प्रधान महाविद्यालयास पुरस्कार

**नागोठणे : बातमीदार, प्रतिनिधी**

येथील कोएसोच्या आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागास उत्कृष्ट स्वंयसेवक, उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी व उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार असे तीन पुरस्कार मुंबई विद्यापीठाने जाहीर केले आहेत.

कोविड काळातील वर्ष २०२० ते वर्ष २०२२ या तीन वर्षातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या भरीव कामगिरी मुळे आदित्य वाटवे याला उत्कृष्ट स्वंयसेवक, प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग, मुंबई विद्यापीठाने पुरस्कार जाहीर केले आहेत. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे यांच्या नेतृत्वाखाली व प्राचार्य डॉ. संदेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबवल्याने हे पुरस्कार महाविद्यालयास प्राप्त झाले आहेत. या यशाबद्दल कोएसोचे अध्यक्ष संजय पाटील, कार्यवाह ॲड. शिद्धार्थ पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक खोपकर, महाविद्यालय विकास समिती सदस्य नरेंद्र जैन, अनिल काळे, ॲड. सोनल जैन, प्राचार्य डॉ. संदेश गुरव, अंतर्गत मुल्यमापन समिती प्रमुख प्रा. डॉ. दिनेश भगत, मिनाक्षी तुपारे यांनी प्राचार्य डॉ. संदेश गुरव व प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे, डॉ. विकास शिंदे व आदित्य वाटवे यांचे अभिनंदन केले आहे.

## आगरदांडा येथे शासकीय योजनांचा लाभ दारोदारी!

**मुरुड : प्रतिनिधी**

अदानी फाउंडेशन अंतर्गत व बँक ऑफ इंडिया शाखा आगरदांडा सहकार्याने नांदले ग्रामपंचायत येथे आयुष्मान भारत कॅम्प व प्रधानमंत्री योजना जीवन सुरक्षा बिमा, अटल पेन्शन योजना कॅम्पचे आयोजन करण्यात आले.

या वेळी प्रमुख उपस्थिती माजी ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, पोलीस पाटील हर्शचंद्र पाटील, बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर विजय दुभाषी, बँक मित्र प्रदीप कदम, बँक सखी माधुरी खोत, अंगणवाडी सेविका रोहिणी कांबळे व ग्रामस्थ उपस्थित होते. अदानी फाउंडेशनचे अवधूत पाटील यांनी शासकीय योजनांची माहिती दिली. बँक ऑफ इंडियाचे विजय दुभाषी यांनी बँकेच्या विविध लाभदायी योजनांबद्दल माहिती दिली. कार्यक्रमात अटल पेन्शन योजनेचे दोन, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना ३३ व आयुष्मान भारत योजनेच्या ११३ लाभार्थ्यांची नोंद करण्यात आली. विशेष सहकार्य अदानी फाऊंडेशनच्या ग्रामसखी प्राजक्ता आदुळकर यांनी केले.



# वर्ल्डकप सराव सामन्यांचे वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) आगामी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेसाठी सराव सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. विश्वचषकाच्या मुख्य सामन्यांपूर्वी १० सराव सामने खेळवले जातील. भारतीय संघ इंग्लंड आणि नेदरलँड्सविरुद्ध सराव सामने खेळणार आहे. ३० सप्टेंबरला गुवाहाटीमध्ये भारताचा सामना इंग्लंडशी आणि ३ सप्टेंबरला तिरुअनंतपुरममध्ये नेदरलँडशी होणार आहे.



५ ऑक्टोबर रोजी विश्वचषक सुरू होण्यापूर्वी १० संघ प्रत्येकी ५० षटकांचे दोन सराव सामने खेळतील. भारतातील तीन वेगवेगळ्या शहरांमध्ये हे सामने होणार आहेत. गुवाहाटी आणि तिरुअनंतपुरमसह हैदराबादलाही सराव सामन्यांचे यजमानपद मिळाले. साखळी फेरीचे तीन सामनेही हैदराबादमध्ये खेळवले जाणार आहेत. या मैदानावर पाकिस्तानचा सामना ६ ऑक्टोबरला नेदरलँडशी आणि १० ऑक्टोबरला श्रीलंकेशी होणार आहे. दरम्यान, ९ ऑक्टोबर रोजी नेदरलँड आणि न्यूझीलंडचे संघ आमनेसामने असतील.

२९ व ३० सप्टेंबरव्यतिरिक्त २ व ३ ऑक्टोबरला सराव सामने खेळवले जातील. पहिल्या सराव सामन्यात बांगलादेशचा संघ श्रीलंकेविरुद्ध खेळणार आहे. त्याच दिवशी दक्षिण आफ्रिका अफगाणिस्तान आणि न्यूझीलंडचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. सर्व सामने दुपारी २ वाजल्यापासून खेळवले जातील. या दरम्यान, सर्व संघांना १५ खेळाडूंना मैदानात उतरवण्याची परवानगी असेल.

विश्वचषकाचे सामने भारतातील १० शहरांमध्ये खेळवले जाणार आहेत. हैदराबाद, अहमदाबाद, धरमशाला, दिल्ली, चेन्नई, लखनऊ, पुणे, बंगळुरू, मुंबई आणि कोलकाता येथे सामने होणार आहेत. सलामीचा सामना अहमदाबादमध्ये ५ ऑक्टोबरला, तर अंतिम सामना १९ नोव्हेंबरला होणार आहे.

### *अशा आहेत मुख्य स्पर्धेच्या लढती*

*या विश्वचषक स्पर्धेत सर्व संघ इतर नऊ संघांबरोबर राऊंड रॉबिन फॉरमॅटमध्ये खेळतील. यापैकी गुणतालिकेतील अव्वल चार संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील आणि विजेते संघ अंतिम फेरीत खेळतील. मागच्या वेळी इंग्लंडमध्ये याच फॉरमॅटमध्ये वर्ल्डकप आयोजित करण्यात आला होता. त्यात इंग्लिश संघाने अंतिम फेरीत न्यूझीलंडचा पराभव केला करून वर्ल्डकपच्या ट्रॉफीवर नाव कोरले होते.*

# श्रेयस अय्यरची वादळी खेळी

## सराव सामन्यात चोपल्या १९९ धावा

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेसाठी लोकेश राहुल आणि श्रेयस अय्यर हे भारतीय संघात पुनरागमन करणार आहेत. तंदुरुस्तीसाठी श्रेयस बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत (एनसीए) बराच कालावधीपासून असून त्याने फिटनेस सिद्ध करण्यासाठी सराव सामनाही खेळला. त्याने ३८ षटके फलंदाजी केली आणि १९९ धावांची खेळी केल्याचे वृत्त आहे.

श्रेयस अय्यरने निवडकर्त्यांना त्याच्या तंदुरुस्तीचा अधिक पुरावा देण्यासाठी तीन-चार दिवसांपूर्वी बंगळुरू येथील एनसीएमध्ये झालेल्या सामन्यात संपूर्ण ५० षटके क्षेत्ररक्षण केले, तर त्याने फलंदाजी करताना गोलंदाजांची धुलाई केली, असे बीसीसीआयच्या सूत्राने सांगितले.

बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले की, अय्यरने गेल्या दोन महिन्यांपासून बंगळुरूमध्ये आहे. येथे राहून तो रिकव्हरी लक्ष केंद्रित करीत आहे. त्याच्यासाठी सर्व काही ठीक चालले आहे. श्रेयसच्या या खेळीनंतर भारतीय निवड समितीच्या चौथ्या क्रमांकाची समस्या निश्चितच काहीशी कमी झाली आहे.



### राहुल मात्र पूर्ण तंदुरुस्त नाही!

श्रेयस अय्यरने त्याच्या तंदुरुस्तीचा पुरावा निवडकर्त्यांना आणि संघ व्यवस्थापनाला दिला आहे, परंतु केएल राहुलच्या दुखापतीबाबत कोणतेही ताजी अपडेट समोर आलेली नाही. जेव्हा निवडकर्त्यांनी राहुलला आशिया चषकाच्या संघात स्थान दिले तेव्हा असे सांगण्यात आले की, त्याला अजूनही थोडासा दुखापत आहे, परंतु तो त्याच्या रिकव्हरीकडे पूर्ण लक्ष देत आहे.

# चांद्रयान-३च्या यशस्वी लँडिंगनंतर टीम इंडियाचा जल्लोष



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयर्लंड दौऱ्यावर असलेल्या भारतीय संघाने चांद्रयान-३चे यशस्वी लँडींग झाल्यावर जोरदार जल्लोष केला. याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

भारतीय संघ हे लँडींग पाहण्यासाठी एकत्र जमला होता. या वेळी खास व्यवस्था करण्यात आली होती. भारताचा कर्णधार जसप्रीत बुमराह, प्रशिक्षक सितांशू कोटक आणि अन्य खेळाडू एकत्रित जमले होते आणि भारताचा इतिहास घडताना त्यांनी पाहिला. त्यानंतर भारतीय खेळाडू हे सामन्याच्या सरावासाठी लागले, कारण भारत आणि आयर्लंड यांच्यातील तिसरा सामना रंगणार होता. पावसामुळे हा सामना होऊ शकला नाही. असे असले तरी आधीचे दोन सामने जिंकले असल्याने ही मालिका भारताने खिशात घातली होती. सामना रद्द झाल्यामुळे भारताने ही मालिका २-० अशी जिंकली आहे.

# मोहम्मद शमीच्या अडचणी वाढल्या

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीच्या अडचणी पुन्हा एकदा वाढल्या आहेत. पत्नी हसीन जहाँने शमी आणि त्याचा भाऊ मोहम्मद हसीबवर आरोप केले होते. वृत्तानुसार आता न्यायालयाच्या आदेशानंतर दोन्ही भावांना ३० दिवसांत जामीन मिळवावा लागणार आहे.

३० ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या आशिया चषकात टीम इंडियात शमीचा समावेश झाला आहे. त्याचबरोबर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत आणि त्यानंतर होणाऱ्या विश्वचषकात तो टीम इंडियासाठी महत्त्वाचे अस्त्र असेल. अशा परिस्थितीत आता शमीला ३० दिवसांच्या आत कोर्टातून जामीन मिळवावा लागणार आहे.

# आशिया कपआधी श्रीलंका आणि बांगलादेशला धक्का

## दुखापतींमुळे दोन खेळाडू स्पर्धेबाहेर

**कोलंबो, ढाका : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेआधी श्रीलंका आणि बांगलादेश संघांना मोठा धक्का बसला आहे, कारण श्रीलंकेचा स्टार वेगवान गोलंदाज दुष्मंता चमीरा खांद्याच्या दुखापतीमुळे आशिया चषक स्पर्धेतून बाहेर पडला आहे. दुसरीकडे बांगलादेशचा इबाबत हुसैन यालादेखील दुखापतीमुळे या स्पर्धेतून माघार घ्यावी लागली आहे.

दुष्मंता चमीराला विश्रांतीचा सल्ला देण्यात आला आहे. त्याला लंका प्रीमियर लीगच्या सामन्यादरम्यान दुखापत झाली होती. श्रीलंकन बोर्डाने दिलेल्या माहितीनुसार असेही म्हटले आहे की, एलपीएलच्या आधी तो त्याच्या घोट्याच्या दुखापतीतून बरा झाला होता. त्याने विश्वचषकासाठी तंदुरुस्त व्हावे अशी आमची इच्छा आहे आणि म्हणूनच





त्याला आशिया कप संघातून वगळण्यात आले आहे. जर तो खांद्याच्या दुखापतीतून बरा होऊन गोलंदाजी करू शकला, तर त्याचा विश्वचषकासाठी विचार केला जाईल.

बांगलादेशचा वेगवान गोलंदाज इबादत हुसेन गेल्या महिन्यात अफगाणिस्तानविरुद्धच्या वनडे मालिकेदरम्यान गुडघ्याच्या दुखापतीमुळे आगामी आशिया चषक स्पर्धेतून बाहेर पडला. इबादतचा १० दिवसांपूर्वी या स्पर्धेसाठी १७ जणांच्या संघात समावेश करण्यात आला होता, पण तो निर्धारित वेळेत दुखापतीतून सावरण्यात अपयशी ठरला.

इबादत हुसेनच्या जागी २० वर्षीय नवा वेगवान गोलंदाज तंजीम हसनचा संघात समावेश करण्यात आला आहे. ५ ऑक्टोबरपासून भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकासाठी २९ वर्षीय खेळाडू वेळेत तंदुरुस्त होईल की नाही हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे मुख्य फिजिओ डॉ. देवाशिष चौधरी म्हणाले, इबादत सहा आठवड्यांपासून दुखापतीतून बरे होण्यासाठी प्रयत्न करीत आहे. या काळात आम्ही त्याचे अनेक वेळा एमआरआय केले, पण तो अजूनही दुखापतीतून पूर्णपणे बरा झालेला नाही. त्यामुळे आम्ही त्याच्याबाबतीत कुठलीही घाई करणार नाही.

# आशिया चषकात वगळलेल्या युजवेंद्र चहलची पोस्ट व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

आशिया चषक स्पर्धेसाठी भारताच्या १७ सदस्यीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघात रवींद्र जडेजा, कुलदीप यादव आणि अक्षर पटेलला तिसरा स्पिनर म्हणून संघात स्थान देण्यात आले. टीम इंडियातून डच्चू मिळाल्यानंतर खुद्द युजवेंद्र चहलने याबाबत ट्विटरवर प्रतिक्रिया दिली आहे.



युजवेंद्र चहलने ट्विटरवर एक इमोजी शेअर करून प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. या ट्वीटमध्ये असे दिसतेय की, एका बाजूला सूर्य ढगांच्या आड लपलेला दिसत आहे, तर दुसरीकडे बाण दाखवून सूर्य चमकत असल्याचे दृष्य दाखवण्यात आले आहे. यावरून असा संदेश दिला जात आहे की, चहल पुन्हा चमकदार कामगिरी करून लवकरच यशस्वी होईल.

आशिया चषकासाठी चहलची निवड का करण्यात आली नाही, असे कर्णधार रोहित शर्माला पत्रकार परिषदेत विचारण्यात आले, त्या वेळी त्याने म्हटले, आर. अश्विन, युजवेंद्र चहल आणि वॉशिंग्टन सुंदर सर्वच वर्ल्डकपच्या प्लॅनमध्ये समाविष्ट आहेत. त्यांचे संघात दाखल होण्याचे दरवाजे बंद झालेले नाहीत, पण आम्हाला असा निर्णय यासाठी घ्यावा लागला की, आम्ही फक्त १७ खेळाडूंनाच संघात सहभागी करू शकतो. अक्षर पटेल आम्हाला फलंदाजीचाही विकल्प देतो आणि या वर्षी त्याने खूप चांगली कामगिरी केली आहे.

# विराटने पास केली यो-यो टेस्ट



**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाने ३० ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या आशिया चषक स्पर्धेसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. स्पर्धेपूर्वी टीम इंडियाच्या सहा दिवसांच्या शिबिराचे आयोजन केले आहे, जिथे खेळाडूंच्या फिटनेसकडे विशेष लक्ष दिले जात आहे. यात विराट कोहलीने यो-यो चाचणी उत्तीर्ण केली असून आनंद व्यक्त केला आहे.

याबाबत विराट कोहलीने अधिकृत इन्स्टाग्रामवरून एक स्टोरी शेअर केली, ज्यामध्ये तो शर्टलेस आणि जमिनीवर बसलेला दिसला. या फोटोच्या माध्यमातून त्याने यो-यो चाचणी पूर्ण केल्यानंतर आनंद व्यक्त केला. विराटने लिहिले, धोकादायक शंकूदरम्यान यो-यो चाचणी पूर्ण केल्याबद्दल आनंदी. पुढे त्याने यो-यो स्कोअर १७.२ आणि डन लिहले.

वेस्ट इंडिज दौऱ्यावर गेलेल्या भारतीय संघाकडून विराट कोहलीने नुकताच शेवटचा सामना खेळला. आता तो आशिया कपच्या माध्यमातून मैदानात परतणार आहे. कसोटी मालिकेतील शेवटचा सामना हा त्याच्या कारकिर्दीतील ५००वा आंतरराष्ट्रीय सामना होता, ज्यामध्ये त्याने शतक झळकावले. यानंतर वनडे मालिकेतील एका सामन्यात तो संघाचा भाग होता, मात्र फलंदाजीसाठी आला नव्हता. आता तो कशी फलंदाजी करतो याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

# विश्वचषक स्पर्धेतील सामन्यांच्या तिकिटांची २४ ऑगस्टपासून विक्री

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा भारतामध्ये ५ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबरदरम्यान होणार आहे. भारताच्या सामन्यांची तसेच सराव सामन्यांची तिकिटांची माहिती आधीच सार्वजनिक करण्यात आली होती. आता बीसीसीआयने चाहत्यांना तिकीट कुठे खरेदी करता येईल याबाबत माहिती दिली आहे. २५ ऑगस्टपासून तिकिटांची विक्री सुरू होणार आहे, मात्र काही चाहते २४ ऑगस्टपासून एक दिवस आधी तिकीट बुक करू शकतात.



विश्वचषकात एकूण ५८ सामने खेळले जाणार आहेत. यामध्ये १० सराव सामन्यांचा समावेश आहे. विश्वचषकाचे सामने भारतातील १० शहरांमध्ये खेळवले जाणार आहेत. हैदराबाद, अहमदाबाद, धरमशाला, दिल्ली, चेन्नई, लखनौ, पुणे, बंगळुरू, मुंबई आणि कोलकाता येथे सामने होणार आहेत. गुवाहाटी आणि तिरुवनंतपुरमव्यतिरिक्त हैदराबाद येथे सराव सामने होणार आहेत. या सामन्यांची तिकिटे तिकीट विक्री वेबसाइटवर खरेदी करता येतील, अशी माहिती बीसीसीआयने दिली. स्पर्धेतील मुख्य सामन्यांची तसेच सराव सामन्यांची तिकिटेही या वेबसाइटवर उपलब्ध असतील. बीसीसीआयने आपल्या ट्वीटमध्ये या वेबसाईटचा उल्लेख केला आहे.

तिकिटांची विक्री २५ ऑगस्टला होणार असल्याचे आयसीसीने सांगितले होते. बीसीसीआयने सांगितले की, चाहत्यांसाठी २४ तास एक अखंड आणि सर्वसमावेशक तिकीट विक्री प्रक्रिया काळजीपूर्वक टप्प्याटप्प्याने आणली जाईल. सुरुवातीच्या टप्प्यात आयसीसीच्या व्यावसायिक भागीदारांसाठी २४ तास अगोदर एक विंडो उघडेल. याचा अर्थ असा की, मास्टरकार्ड असलेले कोणीही २५ ऑगस्टऐवजी २४ ऑगस्टपासून तिकिटे खरेदी करू शकतात. बीसीसीआयने आपल्या वेबसाइटवर याचा उल्लेख केला आहे.

# जयसूर्याचा विक्रम मोडण्याची विराट आणि रोहितला संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

आशिया चषक स्पर्धेत सर्वांच्या नजरा टीम इंडियाच्या विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोन फलंदाजांवर असतील. दोघांनाही या स्पर्धेतील सर्वाधिक धावा करणारा खेळाडू बनण्याची संधी आहे. हा विक्रम श्रीलंकेचा माजी खेळाडू सनथ जयसूर्याच्या नावावर आहे.

आशिया चषकाच्या इतिहासात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम जयसूर्याच्या नावावर आहे, ज्याने १२२० धावा केल्या आहेत. या सर्व धावा फक्त आशिया कपमधील एकदिवसीय सामन्यात केल्या आहेत.

रोहित शर्माने एकदिवसीय आशिया कपमध्ये २२ सामन्यांच्या २१ डावांमध्ये ७४५ धावा केल्या आहेत. त्याच्या नावावर एक शतक आणि सहा अर्धशतके आहेत. दुसरीकडे, विराट कोहलीने आतापर्यंत एकदिवसीय आशिया कपमध्ये ११ सामन्यांच्या १० डावात ६१३ धावा केल्या आहेत.

रोहितच्या टी-२० आशिया कपमध्ये ९ सामन्यांच्या ९ डावात २७१ धावा आहेत. टी-२० आशिया कपबद्दल बोलायचे तर विराटने १० सामन्यांच्या नऊ डावांत ४२९ धावा केल्या आहेत. एकूणच विराटने आशिया चषकात १०४२ धावा आणि रोहितने १०१६ धावा केल्या आहेत. म्हणजेच हे दोघेही सनथ जयसूर्याच्या विक्रमापासून दूर नाहीत, हे आकडे पाहून स्पष्ट होते.

जयसूर्याला मागे टाकण्यासाठी विराटला २००पेक्षा कमी धावांची, तर रोहितला २०५ धावांची गरज आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com